सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ३० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १७ फेब्रुवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## पंतप्रधान नरेंद्र मोदी, राहुल गांधी आज पहिल्यांदाच एकत्र बैठक करणार; निर्णयाकडे देशभराचे लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७मुंबई**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राहुल गांधी एकत्र बैठक घेणार आहेत. आज दिल्लीत दोन्ही नेत्यांची एका मंत्र्यांसह महत्वाची बैठक होत आहे. या हाय लेव्हल बैठकीकडे देशाचे लक्ष लागले आहे. या बैठकीला कारण म्हणजे नव्या मुख्य निवडणूक आयुक्तांची निवड हे आहे.

नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होत आहे. या बैठकीला विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी आणि एक केंद्रीय मंत्री उपस्थित राहणार आहेत. या



बैठकीत नवीन मुख्य निवड़णूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी आलेल्या उमेदवारांच्या नावावर चर्चा होणार आहे. या बैठकीला केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन मेघवाल उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

या निवड समितीमध्ये पूर्वी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीशही होते. परंतू, काही वर्षांपूर्वी यामध्ये बदल करण्यात आले. तेव्हा राहुल गांधी यांनी या बदलाला विरोध केला होता. आता या तिघांच्या सहमतीने किंवा २:१ अशा सहमतीने मुख्य निवडणूक आयुक्तांची निवड केली जाणार आहे.

सरकारचे दोन प्रतिनिधी आणि विरोधकांचा एक असेल तर कोणत्याही परिस्थितीत सरकारला हवे त्याचेच नाव निवडले जाणार आहे. तसेच मुख्य निवडणूक आयुक्तांच्या निवडीवरून काही जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. हे दोन्ही मुद्दे राहुल यांनी मांडत या निवडीच्या प्रक्रियेला विरोध केला आहे. या जनहित याचिकेत सरन्यायाधीशांना समितीत सहभागी न करण्याच्या विरोधातही याचिका आहे, या सर्व याचिकांवर १९ फेब्रुवारीला सुनावणी होणार आहे. सध्याचे सीईसी राजीव कुमार हे १८ फेब्रुवारीला निवृत्त होत आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त कायदा २०२३ मध्ये लागू करण्यात आला आहे. यानुसार ही पहिली मुख्य आयुक्तांची निवड असणार आहे. मार्च २०२४ मध्ये एसएस संधू आणि ज्ञानेश कुमार यांची निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## मेंढ्याच्या कळपातून वाघांच्या कळपात या शिरसाटांची भास्कर जाधवांना खुली ऑफर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७मुंबई**

मागील काही दिवसांपासून ठाकरे गटाला धक्क्यांवर धक्के बसत असल्याची चित्र दिसून येत आहे. ठाकरे गटाचे नेते राजन साळवी यांच्यानंतर कोकणातील अनेक शिंदे गटात सामिल होत आहेत. अशातच आता ठाकरे गटाची बुलंद तोफ आमदार भास्कर जाधव (इहरीज़री गरवहर्ीं) हे शिंदे गटात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा सुरु झाल्या आहेत. त्यावर बोलताना सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी जाधवांना खुली ऑफरच दिलीयं. भास्करराव तुम्ही मेंढ्याच्या कळपातून वाघांच्या कळपात या, अशी ऑफर शिरसाटांनी दिलीयं.



पुढे बोलताना संजय शिरसाट म्हणाले, भास्कर जाधव यांची आता मानसिकता झालीयं. ठाकरे गटातील नेत्यांसोबत काम करण्याची त्यांची इच्छा नाही, हे अनेकदा भास्कर जाधव यांनी सुचवलंय. आता त्यांची विवनवणी काही लोकं करत आहेत, थोडा वेळ लागत आहे, पण मी खात्रीने सांगतो, पुढील अधिवेशनापर्यंत अनेक बदल झालेले दिसतील. जाधव माझे मित्र आहेत त्यांच्याशी मी कधीही बोलू शकतो . भास्करराव या मेंढ्याच्या कळपात राहण्यापेक्षा वाघाच्या कळपात या, असं शिरसाट म्हणाले आहेत.तसेच शिंदे गट भाजपवात विलीन होणार दावा संजय राऊत यांनी केला होता. त्यावरुनही शिरसाट यांनी राऊतांना खोचक प्रत्युत्तर दिलंय. संजय राऊत यांना काल रात्री जास्त झाली होती. रात्रीचं हँगओव्हर अजून उतरलेलं दिसून नाही. त्यामुळेच ते अशी बडबड करीत असल्याची टीका संजय शिरसाट यांनी केलीयं. आत्ता २०२४ चालू असून २०२९ मध्ये उबाठा कुठे असेल त्यावर संजय राऊतांनी भाष्य करावं महापालिका निवडणुकीनंतर उबाठा कुठे असेल हे शोधूनही सापडणार नाही, असंही शिरसाट म्हणाले आहेत.

## 'शिवभोजन' थाळीचा निर्णय अर्थसंकल्पीय अधिवेशनात योजना सुरू ठेवण्याबाबत सरकार सकारात्मक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७मुंबई**

लाडक्या बहीण योजनेमुळे शासनाच्या तिजोरीवरील आर्थिक ताण कमी करण्यासाठी शिवभोजन थाळी बंद करण्याच्या शासनाच्या हालचाली सुरू आहेत. यासंदर्भात काँग्रेससह अनेक पक्षांच्या नेत्यांनी ही योजना बंद न करण्याची मागणी केली आहे. राज्यातील केंद्रचालकांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली आहे. त्यांनी ही योजना बंद न करण्याचे सकारात्मक आश्वासन दिले असले, तरी यासंदर्भातील निर्णय मार्चमध्ये होणाऱ्या राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातच होणार आहे.



गरीब मजूर, कामगारांची उपासमार टाळण्यासाठी शासनाने १० रुपयांत शिवभोजन थाळी सुरू केली. कोरोनाकाळात ही थाळी मोफत दिली जात होती. या थाळीसाठी केंद्रचालकांना देण्यात येणारे ४० रुपयांचे अनुदान महागाईमुळे अपुरे पडत आहे. त्यातच लाडक्या बहीण योजनेमुळे शासनाच्या तिजोरीवर आर्थिक ताण पडला आहे.

ही योजना बंद केल्यास हा भार कमी होणार आहे; परंतु महाराष्ट्र राज्य शिवभोजन चालक संघटनेचे अध्यक्ष किशोर आयरेकर, उपाध्यक्ष महेश जाधव यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील सर्व शिवभोजन चालक मंत्रालयावर एकवटले. लातूरच्या दिव्यांग चालक रंजना कांबळे यांच्या हस्ते ही योजना बंद करू नये, यासाठीचे निवेदन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना दिले. छगन भुजबळ यांच्यासह सर्व पक्षांच्या नेत्यांनीही विनंती केल्याने सरकार ही योजना बंद करण्याच्या निर्णयाचा फेरविचार करत आहे.

## कैद्यांची कुटुंबीयांसोबत 'ई-मुलाखत' गुगलवर 'ई-प्रिझन' या संकेतस्थळावर करावी लागते नोंदणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७अमरावती**

कारागृहात बंदिस्त कैद्यांना भेटण्यासाठी त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक दररोज मोठ्या संख्येत कारागृहात येतात. राज्याच्या विविध जिल्ह्यांतून हे नातेवाईक येतात. यात पैसा आणि वेळही खर्ची होतो. अनेकदा तर अनेक तास प्रतीक्षा करावी लागते. ही बाब लक्षात घेता कारागृह प्रशासनाने कैद्यांसाठी 'ई-मुलाखत'ची सुविधा प्रदान केली आहे. आता कैद्यांना 'व्हिडीओ कॉन्फन्सिंग'च्या माध्यमातून आपल्या कुटुंबीयांशी बोलता येईल. अमरावती मध्यवर्ती कारागृहात या सुविधेचा प्रारंभ झाला आहे.

### वेळेची होते बचत अन् त्रासही कमी



नोंदणी केलेल्या 'ई-मेल आयडी' आणि मोबाइल क्रमांकावर कारागृहातून भेटीची वेळ मिळते. आधुनिक युगात जवळपास प्रत्येक दुसऱ्या व्यक्तीकडे 'स्मार्टफोन' आहे. त्याद्वारे सहजरीत्या नोंदणी केली जाऊ शकते. वेळ, पैसा आणि श्रम वाचवण्यासाठी 'ई-मुलाखत' सोयीची आहे.

**– कीर्ती चिंतामणी,**
**अधीक्षक अमरावती मध्यवर्ती कारागृह**

कारागृह विभागाचे अपर पोलिस महासंचालक प्रशांत बुरडे यांच्या पुढाकाराने आणि कारागृह उपमहानिरीक्षक स्वाती साठे यांच्या मार्गदर्शनात हा उपक्रम कैद्यांसाठी सुरू करण्यात आला आहे. शिक्षा भोगत असलेल्या बंद्यांना महिन्यातून दोन वेळा आणि विचाराधीन बंद्यांना आठवड्यातून एकदा नातेवाइकांना भेटण्याचा नियम आहे. कारागृहात बंदिस्त कैद्यांना भेटण्यासाठी नातेवाइकांना पैसे खर्च करून कारागृहात जावे लागते. त्यानंतर भेटीची परवानगी घेऊन नंबर येण्याची प्रतीक्षा करावी लागते. ही सर्व गुंतागुंतीची व खर्चिक प्रक्रिया असून, यामध्ये नातेवाइकांचा दिवसभराचा वेळ जातो. त्यासाठी ऑनलाइन भेटप्रणाली अत्यंत उपयुक्त असून, वेळ वाचवणारी असून, घरबसल्या भेट घेणे शक्य होते, अशी आहे.

**अशी करावी नोंदणी**

१) व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून भेट घेण्यासाठी प्रथम गुगलवर ई-प्रिझन या संकेतस्थळावर जावे लागेल. त्यानंतर ई-प्रिझन, एनआयसी.इन ही लिंक मिळेल, या पेजवर जाऊन ई-मुलाखतवर क्लिक करताच नवीन पेज उघडेल.

२) यामध्ये वकील किंवा नातेवाईक ज्यांना भेट घ्यायची असेल त्याची सर्व माहिती भरावी लागेल. आयडी प्रूफ साठी आधार कार्डची निवड करावी आणि समोरच्या बॉक्स मध्ये आधार कार्डचा नंबर टाकावा. सोबतच ई-मेल आयडी आणि मोबाइल नंबर टाकावा.

३) त्यानंतर एक वन टाइम पासवर्ड (ओटीपी) मिळेल. त्यानंतर दुसऱ्या बाजूला बंद्याची माहिती, ई-भेटीची तारीख आणि व्हिडीओ कॉन्फ्रन्सिग चा पर्याय निवडावा लागेल.

४) कॅप्चा कोड टाकल्यानंतर ओटीपी मिळेल. व्हिजिट रेफरन्स क्रमांक येईल. तो क्रमांक वकील किंवा नातेवाइकाला स्वतःकडे लिहून ठेवावा लागेल.

## राज्यातील ८१ पैकी ३३ औषध निरीक्षक होणार सहायक आयुक्त; आता औषधांची नमुने कोण घेणार?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७बीड**

अंबाजोगाई स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयातून बोगस औषधी वितरणाचा प्रकार उघड झाल्यानंतर राज्यातील सर्वच शासकीय रुग्णालयांच्या औषधांची तपासणी करण्याच्या सूचना निरीक्षकांना दिल्या. परंतु याचे नमुने घेण्यासाठी औषध निरीक्षकच अपुरे समोर आले आहे. सध्या राज्यात २०० पैकी ८१ निरीक्षक कार्यरत आहेत. त्यातील ३३ जणांना आठवडाभरात पदोन्नती मिळून ते सहायक आयुक्त होणार आहेत. त्यामुळे केवळ ४८ जणच फिल्डवर राहतील. मग बोगस औषधी तपासणार कोण, हा प्रश्न आहे. त्यामुळे नवी भरती करणे आवश्यक आहे.

कोल्हापूरच्या विशाल एंटरप्रायजेस या कंपनीने ८५ लाख गोळ्यांचा राज्यभरात पुरवठा केला होता. यात अंबाजोगाईसह अनेक ठिकाणची औषधी बोगस आढळली होती. त्यानंतर औषध प्रशासनाने जानेवारी ते मार्च या तीन महिन्यात प्रत्येक शासकीय रुग्णालयातून औषध नमुने घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे एका निरीक्षकला महिन्याला १० अनौपचारिक नमुने घेण्याचे उद्दिष्ट दिले. परंतु यासाठी राज्यात मनुष्यबळच नसल्याचे समोर आले. उपलब्ध




असलेल्या निरीक्षकांनाच इतर जिल्ह्यांचा पदभार देण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्यावर कामाचा ताण वाढत आहे.

**मेडिकलची तपासणी कशी होणार?**

एप्रिल ते डिसेंबर २०२४ या कालावधीत एका निरीक्षकाला महिन्याला १० मेडिकलची तपासणी आणि तीन नमुने घेण्याचे उद्दिष्ट होते. परंतु बोगस औषधीचे प्रकरण समोर आल्यानंतर शासकीय रुग्णालयातील १० नमुने घेण्याचे उद्दिष्ट दिले. परंतु ते घेण्यासाठी निरीक्षकच नसल्याचे समोर आले आहे. मग शासकीयच नव्हे तर खासगी मेडिकलची तपासणी कशी होणार, हा प्रश्न आहे.

## राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच होतील; चंद्रशेखर बावनकुळेंचा विश्वास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७पुणे**

राज्यातील इतर मागासवर्गीयांच्या (ओबीसी) आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने ज्या-ज्या बाबींची पूर्तता करण्यास सांगितले होते, त्या बाबींची पूर्तता राज्य सरकारने केली आहे. त्यामुळे न्यायालय लवकरच निवडणूक आयोगाला आदेश देईल आणि लवकरच राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील, असा विश्वास भाजपचे प्रदेशाध्यक्ष व राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला.

पुणे आणि सोलापूर जिल्ह्यातील भाजप पदाधिकाऱ्यांसाठी रविवारी पुण्यातील घरकुल लॉन्स येथे बावनकुळे यांच्या उपस्थितीमध्ये संघटन पर्व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, ओबीसी आरक्षणासंदर्भात राज्य सरकारने आपले अंतिम म्हणणे



न्यायालयासमोर मांडले आहे. आता सर्वोच्च न्यायालयाकडून केव्हाही या प्रकरणाचा निकाल येऊ शकतो. न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्याव्यात, असे आदेश दिले की आम्ही तातडीने निवडणुका घेऊ. विधानसभेत महायुतीने २३७ जागा जिंकल्या होत्या. आताही सर्व महापालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांवर महायुतीच विजयी होईल,' असे बावनकुळे म्हणाले.'आमचे सरकार योजना बंद करणारे नसून नवनव्या योजना मांडणारे सरकार आहे. आम्ही प्रत्येक योजनेसाठी स्वतंत्र अर्थशीर्ष तयार करून त्यासाठी पुरेशी तरतूद केली आहे. त्यामुळे कोणतीही योजना बंद होणार नाही. नियमानुसार लाभार्थ्यांना योजनेचा लाभ दिला जाईल. जे पात्र नाहीत किंवा ज्यांना योजनेच्या लाभाची गरज नाही, त्यांनी योजनेतून बाहेर पडावे, असे आमचे आवाहन आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही नागरिकांना गॅसवरील अनुदान सोडून देण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार आम्हीही आवाहन करू, असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

विधानसभा निवडणुकीमध्ये आम्ही अजित पवार व एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला २१ उमेदवार दिले. त्यातील ११ निवडून आले. आम्ही त्यांना उमेदवार देऊन सहकार्य केले. राज्यात डबल इंजिन सरकार आले पाहिजे, एवढाच आमचा उद्देश होता, असेही बावनकुळे म्हणाले.

## ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवरून खते खरेदी करू नका, इफकोचा शेतकऱ्यांना सल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७मुंबई**

ऑनलाइन विक्रीमुळे बनावट पद्धतीचे खते आणि औषधे शेतकऱ्यांना दिले जात असल्याच्या तक्रारी समोर येऊ लागल्या. त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी जागतिक स्तरावरील सर्वात मोठी खतांची सहकारी संस्था असलेल्या इफकोने एक प्रसिद्धी पत्रक जारी करत इ-कॉमर्स प्लॅटफॉर्मवरून खते खरेदी न करण्याचा सल्ला दिलाय.



इफकोने सर्व शेतकऱ्यांना तसेच सहकारी संस्था, खरेदीदार आणि किरकोळ विक्रेत्यांना स्पष्ट सांगितलंय की, कोणत्याही ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मला इफको ची उत्पादने विकण्याचा अधिकार नाही. इफकोच्या प्रसिध्दी पत्रकात म्हटलंय की, या अनधिकृत ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरून कोणतेही खतं किंवा इतर उत्पादन खरेदी केल्यास ती पूर्णत त्या शेतकऱ्याची, खरेदीदाराची जबाबदारी असेल.

## संपादकीय ......

# लोकांना परजीवी बनवू नका!

*युद्धात, प्रेमात आणि निवडणुकीत सारे काही क्षम्य असते, असे मानण्याची पद्धत आहे. केवळ निवडणुकांचा विचार केला, तरी त्यावेळी अनेक तडजोडी केल्या जातात. निवडणुका जवळ येतात, तशी पक्षांतरे होऊ लागतात. लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते दारोदारी फिरून जनतेची विचारपूस करू लागतात. नवीन प्रकल्पांच्या कोनशिला बसवल्या जातात आणि योजनांचे शुभारंभ केले जातात. दौरे आणि यात्रा सुरू होतात. जनतेबद्दलच्या कळवळ्याचे आणि उमाळ्याचे प्रदर्शन मांडले जाते! चार-चार वर्षे लोकांच्या प्रश्नांकडे ढुंकूनही न पाहणारे राजकीय पक्ष अचानक जागे होतात. एरवी कार्यकर्त्यांची व लोकांची कामे न करणारे मंत्री सक्रिय होतात. घोषणा आणि आश्वासनांचा पाऊस पडतो. अमुक करू आणि पाच वर्षांत तमुक करू, अशा वल्गना केल्या जातात. शिवाय फुकट वीज, पाणी, अन्नधान्य वा इतर वस्तूंचे वाटप करण्यास सुरुवात होते; परंतु आता निवडणुकीदरम्यान दिल्या जाणार्या मोफतच्या योजना चुकीच्या आहेत, सरकार लोकांना मोफत रेशन देत असल्याने लोक काम करू इच्छीत नाहीत. ते आळशी आणि परजीवी बनत चालेल आहेत, अशी स्पष्टोक्ती सर्वोच्च न्यायालयानेच दिली आहे. शहरांमधील बेघरांना आश्रय देण्यासंबंधीच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू आहे. त्यामध्ये केंद्र सरकार पक्षकार आहे. सुनावणीप्रसंगी न्यायालयाने केंद्राला गोरगरिबांची काळजी आहे, याचे कौतुकही केले; परंतु बेघरांना नुसता आश्रय देण्याऐवजी त्यांना विकासाच्या प्रक्रियेत सामील करून घ्या, नोकरी द्या किंवा व्यवसाय-उद्योग उपलब्ध करून द्या आणि स्वावलंबी बनवा. त्याऐवजी फक्त पैसे देण्यातून असे गरीब लोक सतत सरकारी योजनांवरच अवलंबून राहतील आणि स्वावलंबी बनणार नाहीत, असे न्यायालयाने म्हटले असून, न्यायालयानेच व्यवस्थेचे कान टोचले ते बरे झाले.*

*कामाची संधी असेल, तर ते करायची इच्छा नसलेले लोक या देशात फार कमी असतील, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांच्या वतीने वकील प्रशांत भूषण यांनी केला. यावर तुम्हाला एकाच बाजूचे ज्ञान आहे. मी शेतकरी कुटुंबातील आहे. महाराष्ट्रात निवडणुकांपूर्वी झालेल्या मोफतच्या घोषणांमुळे शेतमजूर मिळेनासे झाले आहेत, असे न्या. भूषण गवई यांनी त्यांना सुनावले. महाराष्ट्रात निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण किंवा अन्य योजनांमधून मोफत मिळणारे अर्थसाह्य वा वस्तूंमुळे लोकांना कामच करण्याची इच्छा होत नाही, हे न्यायमूर्तींचे मत वास्तवावर आधारित आहे, असेच म्हटले पाहिजे. सरकारी योजनांमुळे लोक बाहेर पडत नाहीत आणि परिणामी बांधकाम क्षेत्रात कामगारांचा तुटवडा जाणवू लागला आहे, असे मत अलीकडेच 'लार्सन अँड टुब्रो'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक एस. एन. सुब्रमण्यम यांनीदेखील व्यक्त केले आहे. वास्तविक निवडणुकीच्या अगोदर विविध सरकारे मोफत योजना सुरू करतात, त्याबाबत निवडणूक आयोगाची काय भूमिका आहे, अशी विचारणा पूर्वी न्यायालयाने केली होती. त्यावर मोफत योजना कोणत्या आहेत आणि नाहीत, हे काही आम्ही ठरवू शकत नाही. त्याबाबत न्यायालयानेच निर्णय घ्यावा, अशाप्रकारे भूमिका घेत निवडणूक आयोगाने हात वर केले होते. खरे तर, याबद्दल स्पष्ट भूमिका घेतली असती, तर आयोगाने गेलेली अब्रू परत मिळवली असती.*

*वास्तविक विधानसभा वा लोकसभा निवडणुकांच्या दरम्यान राजकीय पक्षांनी फुकट योजनांची आश्वासने देणे म्हणजे लोकप्रतिनिधी कायदा १९५१ अंतर्गत लाच किंवा मतांसाठीची प्रलोभनेच मानली पाहिजेत, अशा आशयाची याचिका यापूर्वी सर्वोच्च न्यायालयात करण्यात आली होती. अशा आश्वासनांवर बंदी घालावी, एवढेच नव्हे, तर निवडणूक आयोगाने अशा पक्षाची मान्यता रद्द करावी, अशी मागणी भाजप नेते अश्विनी उपाध्याय यांनी एका याचिकेत केली होती. खरे तर, आपल्या देशात रेवडी वाटून मते मागण्याची संस्कृती रुजत असून, ती देशाच्या विकासासाठी अत्यंत घातक असल्याची टीका अडीच वर्षांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच केली होती. रेवडी संस्कृतीचे लोक नवे द्रुतगती महामार्ग, विमानतळ वा संरक्षण कॉरिडॉर कधीच बांधणार नाहीत; मात्र रेवडी वाटून ते लोकांना विकत घेतील. आपण सर्वांनी अशा विचारसरणीला पराभूत करून राजकारणातून रेवडी संस्कृतीला हटवायचे आहे, असे आवाहनही त्यांनी केले होते. थोडक्यात, नवीन कारखाने, धरणे, बंदरे, औद्योगिक कॉरिडॉर, गोदामे बांधल्यास अशा पायाभूत व्यवस्थांमुळे प्रगतीची महाद्वारे खुली होतात. त्यामुळे नवीन गुंतवणूक, उद्योग-धंदे व रोजगारास चालना मिळते. याप्रकारचा विकास चिरस्थायी असतो; परंतु त्यासाठी खूप कष्ट घेऊन चिकाटीने प्रयत्न करावे लागतात. त्याऐवजी राज्यकर्त्यांना मोफत वा सवलतीच्या योजना देऊन लोकांना आकर्षित करून घ्यावे, असे वाटते.*

*केंद्रानेदखील मोफत अन्नधान्य देण्याची योजना सुरूच ठेवली आहे. छत्तीसगडमधील भाजपच्या विजयात विवाहित महिलांना वर्षाला १२ हजार रुपये, भूमिहीन शेतमजुरांना वर्षाला दहा हजार रुपये अशा योजनांचा हात होता. नवी दिल्लीत 'आप' सरकारने फुकटातल्या योजनांवरच २०१५ व २०२० मध्ये यश मिळवले. राजस्थानमधील अशोक गेहलोत यांच्या काँग्रेस सरकारने विद्यार्थ्यांना मोफत लॅपटॉप, ५०० रुपयांत घरगुती गॅस सिलिंडर, 'चिरंजीवी' योजनेंतर्गत रुग्णालयांमध्ये ५० लाख रुपयांचा विमा अशी आश्वासने देऊन मते मिळवण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसने कर्नाटक व तेलंगणात अशाच अनेक गॅरंटी देऊन विजय मिळवला. महाराष्ट्रात लाडकी बहीण, आनंदाचा शिधा, ज्येष्ठ नागरिकांसाठी तीर्थक्षेत्र दर्शन अशा अनेक योजना सुरू करण्यात आल्या. लाडकी बहीण योजनेत लाखो अपात्र असलेल्या महिलांनीही गैरफायदा घेतल्याचे उघडकीस आले. या योजनांमुळे राज्याच्या वित्तीय तुटीत लक्षणीय भर पडली असून, आता कठोर वित्तीय शिस्त आणण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना करावा लागत आहे. थोडक्यात, रेवड्या सगळ्यांनीच वाटलेल्या आहेत. जनतेला परावलंबी बनवले जात आहे. सर्व राजकीय पक्षांनी मतैक्य घडवून हा आर्थिक बेजबाबदारपणा आतातरी थांबवलाच पाहिजे.*



# धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने देऊरवाड्याचा करू विकास - आमदार प्रवीण तायडे

## देऊरवाडा येथे नागरी सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७चांदूरबाजार**

धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने देऊरवाड्याचा विकास करू असे देऊरवाडा येथील आयोजित नागरिक सत्कार मध्ये बोलताना आमदार प्रवीण तायडे म्हणाले.

तालुक्यातील देऊरवाडा येथे भाजपा तर्फे नवनिर्वाचित आमदार प्रवीण तायडे यांचा नागरिक सत्कारचे आयोजन करण्यात आले होते. या नागरी सत्काराच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खरेदी-विक्रीचे संचालक दादासाहेब आसलकर होते. तर प्रमुख पाहुण्यांमध्ये बियाणे महामंडळाचे अध्यक्ष प्रमोद कोरडे, भाजपाचे ज्येष्ठ नेते अशोकराव बनसोड, ओबीसी भाजपाचे महामंत्री गजानन कोल्हे, तालुका भाजपा अध्यक्ष मुरली माकोळे, शहराध्यक्ष टिकू अहिर, माजी उपाध्यक्ष नपा अतुल रघुवंशी, मनोहर सुने, विलास तायवाडे, नितीन टिंगणे, भाजपा माजी तालुकाध्यक्ष किरण सिनकार, अरुण पोटे, अतुल दारोकार, जयश्रीताई पंडागळे, ललिताताई गायकवाड, सरोजताई दातीर, आदी म्हणजे काय वर उपस्थित होते.

यावेळी नवनिर्वाचित आमदार प्रवीण तायडे, बियाणे महामंडळाचे अध्यक्ष प्रमोद कोरडे, व भाजपा ओबीसी महामंत्री गजानन कोल्हे यांचा शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन नागरी सत्कार करण्यात आला.

यावेळी किरण सिनकर यांनी आपल्या श्री क्षेत्र देऊरवाडाचा विकास करावा अशी मागणी त्यांनी यावेळी आपल्या प्रस्तावनातून केली. आपल्या नागरी सत्कारामध्ये उत्तर देताना आ. प्रवीण तायडे म्हणाले की, तीर्थक्षेत्राच्या विकासामुळे ग्रामीण भागातील युवकांच्या हाताला काम मिळेल. यासाठी मी शासन दरबारी आपल्या देऊरवाडा येथील समस्या मांडून जास्तीत जास्त निधी देऊरवाडा तीर्थक्षेत्रासाठी कसा मंजूर करता येईल यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे संचालन श्याम पोकळे व आभार प्रदर्शन खुशाल दातीर यांनी केले. या कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरिता देऊरवाडा येथील भाजपाच्या सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.




# कसे टाळाल मानेचे आजार?

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक**

मानेशी संबंधित आजार हा सामान्य असून, तो वेगवेगळ्या वयोगटांतील लोकांमध्ये आढळतो. सततच्या चुकीच्या बसण्याच्या सवयी, मोबाईल व संगणकाचा अतिरेकी वापर, अपघात, स्नायूंचे ताण आणि हाडांशी संबंधित आजार यामुळे मानदुखी व इतर मानेशी संबंधित समस्या उद्भवतात.

जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, जगभरातील ७०% लोकांना आयुष्यातील कोणत्यातरी टप्प्यावर मानदुखीचा त्रास होतो. अमेरिकन ऑर्थोपेडिक असोसिएशनच्या संशोधनानुसार, मोबाईल व संगणकाचा सतत वापर करणार्या ६०% लोकांना टेक्स्ट नेक सिंड्रोमचा त्रास होण्याची शक्यता असते.भारतीय फिजिओथेरपी असोसिएशनच्या सर्व्हेनुसार १५ ते ३५ वयोगटातील ८०% तरुण मोबाईल आणि संगणकामुळे मानदुखीचा त्रास अनुभवतात.

**मानेशी संबंधित प्रमुख आजार**

सर्व्हायकल स्पॉंडिलोसिस : ही एक हाडांशी आणि संधिवाताशी संबंधित समस्या असून, ती वयोमानानुसार वाढते. या विकारात मणक्यांमधील गादी (डिस्क) झिजल्यामुळे मानेत वेदना, जडपणा आणि काहीवेळा हात व खांद्यांमध्ये मुंग्या येण्याची समस्या निर्माण होते. सतत एकाच पोझिशनमध्ये बसणे, संगणक व मोबाईलचा अधिक वापर, वय वाढल्यामुळे हाडे कमकुवत होणे, स्नायूंवरील अनावश्यक ताण यामुळे ही समस्या निर्माण होते. यावर वैद्यकीय उपचारांखेरीज नियमित मान व खांद्याचे व्यायाम, बसण्याची स्थिती सुधारणे आणि वेदना कमी करण्यासाठी गरम किंवा थंड शेक घेण्याने आराम मिळतो.

**सर्व्हायकल डिस्क हर्निएशन** : मणक्यांमधील गादी (डिस्क) बाहेर येऊन मज्जातंतूंवर (नसा) दाब देते. यामुळे मानेत तीव्र वेदना, हात आणि बोटांमध्ये मुंग्या किंवा बधिरता जाणवू शकते. अतिजड वस्तू उचलणे, चुकीच्या स्थितीत झोपणे, अचानक मानेवर जास्त ताण येणे यामुळे हा त्रास उद्भवू शकतो.

**टेक्स्ट नेक सिंड्रोम** : सतत मोबाईल वापरल्यामुळे मानेच्या स्नायूंवर ताण येऊन हा आजार जडतो. विशेषतः, चुकीच्या स्थितीत मान झुकवून दीर्घकाळ मोबाईल पाहात राहिल्याने ही समस्या निर्माण होते. यावर उपाय म्हणजे दर ३० मिनिटांनी मान ताणण्याचे व्यायाम करावेत.



अर्थातच, यासाठी फिजिओथेरपिस्ट किंवा डॉक्टर किंवा योगातज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. फिजिओथेरपीने स्नायू बळकट करून मानेच्या वेदना कमी करता येतात. मसाज थेरपीमुळे रक्तप्रवाह सुधारतो आणि स्नायूंना आराम मिळतो.गरम पाण्याने शेक घेतल्यामुळे स्नायू सैल होण्यास मदत होते; तर बर्फाने शेकल्यास जळजळ आणि वेदना कमी होतात.मानेतील ताण कमी करण्यासाठी भुजंगासन उपयुक्त ठरते; तर मणका लवचिक ठेवण्यासाठी मार्जारासन उपयुक्त ठरते. याखेरीज आपली झोपण्याची उशी जास्त उंच किंवा खूप सपाट नसावी. मान सरळ ठेवून झोपण्याची सवय लावावी. तसेच कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी युक्त पदार्थ जसे की दूध, हिरव्या पालेभाज्या यांचा आहारात समावेश करावा.एकूणच, मानदुखी आणि इतर मानेच्या समस्या जीवनशैलीतील चुकीच्या सवयींमुळे वाढत आहेत. संगणक आणि मोबाईलचा अतिरेकी वापर, चुकीची बसण्याची स्थिती आणि व्यायामाचा अभाव यामुळे हा त्रास अधिक वाढतो. मानेचे आरोग्य सुधारण्यासाठी, लहान-सहान सवयींमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. वेळेवर निदान आणि उपचार घेतल्यास या समस्यांपासून मुक्तता मिळू शकते.

# जिवाणू खतांचा वापर कसा व किती करावा? अन् वापरतांना काय काळजी घ्यावी?

**दि.१७विदर्भ प्रजासत्ताक**

पिकास आवश्यक त्या विशिष्ट अन्नद्रव्याची उपलब्धता वाढविणाऱ्या जिवंत किंवा सुप्त अवस्थेतील जिवाणूंच्या वाहकांमध्ये केलेल्या मिश्रण म्हणजे जैविक खत, जिवाणू संवर्धक होय.यामध्ये नत्र, स्फुरद, पालाश व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये पिकाला हे उपलब्ध करून देण्यासाठी सक्रिय आणि सूक्ष्म अशा उपयुक्त जिवाणूंचा वापर करता येतो.




**जिवाणू खते वापरण्याच्या पद्धती व मात्रा**

१) बीजप्रक्रिया

- १०० मि.लि. द्रवरूप जिवाणू संवर्धक खत प्रति १० किलो बियाण्यासाठी वापरावे.

- जैविक खते प्रामुख्याने बीजप्रक्रियेसाठी वापरली जातात. ही सोपी व फायदेशीर पद्धती आहे.

- बीजप्रक्रिया करताना हलक्या हाताने सर्व बियाण्यास जिवाणू संवर्धक सारख्या प्रमाणात लावावे.

- त्यानंतर सावलीत सुकवून पेरणी करावी.

- या प्रकारे एक किंवा एकापेक्षा जास्त जैविक खतांची बीजप्रक्रीया करता येते.

**२) रोपांची मुळे बुडविणे**

ज्या पिकांमध्ये रोपे तयार करून त्यांची पुर्नलागवड केली जाते त्या पिकांसाठी ही पद्धत उपयुक्त आहे. एक लिटर जैविक खत १०० लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करावे. रोपांची पुर्नलागवड करण्यापूर्वी रोपांची मुळे अर्धा तास कालावधीसाठी या द्रावणात बुडवून ठेवावीत व त्यानंतर लागवड करावी.




**३) बेणे प्रक्रीया**

केळी, ऊस, बटाटा, हळद, आले इत्यादी पिकांच्या बेण्यास जैविक खताची प्रक्रीया केली जाऊ शकते. ४०० लिटर पाण्यात १ लिटर जैविक खत मिसळावे व द्रावण तयार करावे. या द्रावणात पिकाचे बेणे अर्धातास बुडवून ठेवावे व त्यानंतर लागवड करावी.


**४) पिकाच्या मुळांभोवती खत देणे**

उभ्या पिकास जैविक खत स्प्रे पंपाच्या सहाय्याने देता येते. २०० लिटर पाण्यात १ लिटर जैविक खत मिसळून द्रावण तयार करावे. हे द्रावण सकाळी किंवा सायंकाळी पिकांच्या मुळाजवळ नोझल काढलेल्या पंपाच्या सहाय्याने फवारावे किंवा आळवणी करावी.

**५) ठिबक सिंचनाद्वारे देणे**

ठिबक सिंचनाद्वारे जैविक खत पिकांना देता येते. एक एकर क्षेत्रासाठी १ लिटर जैविक खत ठिबक सिंचनाच्या यंत्रणेतून द्यावे. फळपिके, केळी, ऊस, कापूस इत्यादी पिकांना ही पद्धत उपयुक्त आहे.




**६) माती, शेणखत किंवा गांडूळ खतात मिसळून देणे**

माती किंवा शेणखत किंवा गांडूळ खतात मिसळून जैविक खत दिले जाऊ शकते. ४०० ते ६०० किलो ओलसर मातीत किंवा शेणखतात किंवा गांडूळ खतात १ लिटर जैविक खत मिसळून रात्रभर ठेवावे. करावा.

**२) जैविक खत कोरड्या जागी ठेवावे.**

३) जैविक खतांमध्ये जैविक घटक असल्यामुळे त्यांचा वापर रासायनिक खतात मिसळून करू नये.

४) जैविक संवर्धक लावण्यापूर्वी जर बियाण्यास/बेण्यास कीटकनाशक, बुरशीनाशक याची बीजप्रक्रिया करायची असल्यास अगोदर अशी प्रक्रिया पूर्ण करूनच नंतर जिवाणूंची प्रकिया करावी.

५) कडधान्यवर्गीय पिकासाठी गटानुसार योग्य ते रायझोबियम खत निवडावे.

# कृषी प्रदर्शनात लक्ष वेधून घेणारे पॉवर टिलरविएसटी कंपनीच्या स्टॉलवर शेतकऱ्यांची गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती.**

स्थानिक सायंसकोर मैदानावर सुरु असलेल्या कृषी प्रदर्शनी मध्ये विएसटी कंपनीचे पॉवर टीलर, पॉवर वीडर शेतकर्यांचे लक्ष वेधून घेत आहे. यामुळे स्टॉल क्रमांक ए ७ वर शेतकर्याची गर्दी दिसून येत आहे. शासकीय अनुदान योजनेमध्ये पात्र असल्यामुळे अनेक शेतकरी प्रदर्शनी मध्ये स्पॉट बुकिंग करत आहे.

पॉवर टीलर, पॉवर वीडर सारखे अत्याधुनिक यंत्र वापरुन शेती अधिक किफायतशीर व फायदेशीर बनविण्यास मदत मिळते. कमी वेळ व कमी खर्चा मध्ये अधिक काम करणार्या या यंत्रांमुळे मजुरांच्या समस्येपासुन मुक्ती मिळते. शेत जमीन मशागत, पेरणी, फवारणी, डवरणी, नांगरणी, वखरणी, अंतर मशागत, सरी पाडणे, वाटरपंप इत्यादी सह सर्व प्रकारचे शेती कामांमध्ये हे यंत्र उपयोगी आहे. रोटावेटर, पट्टीपास, कल्टीवेटर सह सर्व प्रकारचे अटॅचमेंट जोडणे सहज शक्य आहे. सोयाबीन, कापुस,



तुर, फळ पीकांसह सर्व प्रकारच्या पिकांमध्ये उपयोगी असून फ्रंट व रिवर्स गेयर मुळे मशिन हाताळने एकदम सोपे आहे. ट्रॅक्टरच्या तुलनेत स्वस्त पण ट्रॅक्टर प्रमाणे सर्व शेती काम करणारे के यंत्र आहे. व्हीएसटी भारतातच नव्हे विश्वभरामध्ये एक विश्वसनीय नाव आहे.ज्यामध्ये पावर टीलर मध्ये ९ एचपी ते १३ एचपी पर्यंत रेंज आहे. त्याच प्रमाणे पावर विडर ३.५ एचपी ते ८ एचपी पर्यंत व पावर रिपर ५ एचपीचे उपलब्ध आहे. व्हीएसटीचे अधिकृत डीलर एलीट एंटरप्रायझेस अंतर्गत शिवरत्न ॲग्रो सर्विसेस मध्ये पावर टीलर, पावर विडर सोबत रिपर, ब्रश कटर ची विक्री, सर्विस व स्पेयर पार्ट्स उपलब्ध आहे. प्रदर्शनी नंतर ही शेतकरी शिवरत्न ॲग्रो सर्विसेस, माऊली कॉम्प्लेक्स, नवसारी रोड, यशवंतराव मुक्त विद्यापीठ समोर, अमरावती येथे प्रत्यक्ष अथवा ०८९९९८७८०४०, ९४२३६२२४५९ मोबाइल नंबर वर संपर्क साधु शकतात. पश्चिम विदर्भातील एकमेव व्हीएसटीचे अधिकृत डीलर शिवरत्न ॲग्रो सर्विसेस (एलीट एन्टरप्रायझेस) ला एकदा अवश्य भेट देण्याचे आवाहन संचालकांनी शेतकर्यांना केली आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. १७ फेब्रुवारी २०२५ शहर/ग्रामिण


# अमरावती विद्यापीठात अनियमितता; निवृत्त न्यायाधीश करणार चौकशी

## तीन महिन्यांत शासनाला चौकशी अहवाल सादर करावा लागणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात अनियमितता झाल्याच्या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेत स्थापित चारसदस्यीय समिती चौकशी करणार आहे. या समितीला तीन महिन्यांत शासनाला चौकशी अहवाल सादर करावा लागणार आहे. या अनियमिततेबाबत राज्य शासनाकडे तक्रार करण्यात आली आहे.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील अनेक गैरव्यवहारांच्या चौकशीसाठी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती मारोतीराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारने बुधवार, १२ फेब्रुवारीला चौकशी समितीची पुनर्रचना केली आहे. राज्य शासनाच्या निर्णयानुसार मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेल्या आणि पूर्वी स्थापन केलेल्या समितीची जागा ही नवीन समिती घेणार असून, तीन महिन्यांत तपशीलवार अहवाल सादर करावे लागणार आहेत.



राज्य सरकारने विद्यापीठ प्रशासन आणि उच्च शिक्षण संचालनालयाला आवश्यक कागदपत्रे आणि माहिती समितीला देण्याचे निर्देश दिले आहेत. या चौकशीचे निष्कर्ष विद्यापीठातील प्रशासन आणि आर्थिक समस्यांचे निराकरण करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील, अशी अपेक्षा आहे.

मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती मारोतीराव गायकवाड हे समितीचे अध्यक्ष आहेत; तर या समितीत उच्च शिक्षण संचालनालय, पुणे येथील लेखा विभागाचे सहायक संचालक शिवाजी थोम्ब्रे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे वरिष्ठ कायदा अधिकारी डॉ. परवीन सय्यद आणि उच्च शिक्षण विभाग, अमरावती विभागाचे विभागीय सहसंचालक केशव तुपे हे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील.तक्रारीच्या अनुषंगाने लेखापरीक्षण शुल्क भरण्यात विद्यापीठाचे अपयश, निधी वाटप करूनही बुलढाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेज पूर्ण होण्यास विलंब आणि पदोन्नती देणे, जे आधीच रद्द करण्यात आले होते, या बाबी तपासाखाली असलेल्या प्रमुख आहेत.याव्यतिरिक्त, ही समिती कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या अनधिकृत नेमणुकीच्या आरोपांची चौकशी करील, ज्यामुळे कायदेशीर वाद निर्माण होतील आणि सरकारवर आर्थिक बोजा वाढेल. इतर मुद्द्यांमध्ये कर्मचाऱ्यांना निलंबन भत्ते न देणे, अनुकंपा नियुक्त्या अमलात आणण्यास होणारा विलंब.

विद्यापीठाचे कुलसचिव ३ आणि शारीरिक शिक्षण संचालकांच्या नियुक्तीतील कथित अनियमिततेचा यात समावेश आहे. तपासादरम्यान प्राप्त झालेल्या इतर तक्रारींची तपासणी करण्याचे अधिकारही या समितीला आहेत.

# पोलिस महासंचालक कार्यालयातून आदिवासींची ३९८ पदे बेपत्ता

## अधिसंख्य १ हजार २३१ अन् रिक्त केवळ ८३३ पदे!



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरवती**–राज्याच्या पोलिस महासंचालक कार्यालयाने बनावट जातप्रमाणपत्राच्या आधारे बळकावलेली अनुसूचित जमातीची १ हजार २३१ पदे अधिसंख्य केली; परंतु रिक्त केवळ ८३३ पदे दाखविली आहेत. अनुसूचित जमातींची ३९८ राखीव पदे बेपत्ता झाल्याची धक्कादायक बाब पुढे आली आहे.

पोलिस महासंचालक मुंबई कार्यालयात गट 'अ' ते 'ड' संवर्गात एकूण मंजूर पदे १ लाख ५८ हजार १२३ आहेत. यापैकी अनुसूचित जमातीसाठी १३ हजार ६१५ पदे राखीव दाखविण्यात आली आहेत. जातवैधता प्रमाणपत्र सादर करणाऱ्यांची संख्या १२ हजार ९७५ आहे. तब्बल २ हजार ६९ जणांनी जातवैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

पोलिस महासंचालक कार्यालयात अनुसूचित जमातीच्या राखीव व भरलेल्या पदात स्पष्ट तफावत आढळली आहे. अनुसूचित जमातीसाठी १३ हजार ६१५ पदे राखीव दाखविण्यात आली असून भरलेल्या पदांची संख्या १५ हजार ४४ दाखविण्यात आली आहे. तब्बल १ हजार ४२९ पदांची तफावत आहे.

> कोणतीही चोरी केली की तो गुन्हा ठरतो. खुद्द पोलिस महासंचालक कार्यालयात बनावट जातप्रमाणपत्र सादर करून आमच्या घटनात्मक हक्काची १ हजार २३१ पदे बळकावली आहेत. अशांवर पोलिस महासंचालक जातपडताळणी कायद्यान्वये गुन्हे दाखल करावेत. ३९८ बेपत्ता झालेल्या पदांचा छडा लावून आदिवासी समाजाला न्याय द्यावा. विशेष पदभरती मोहीम राबवण्यात यावी.
>
> – **अरविंद वळवी,** राज्य संघटक, ट्रायबल फोरम.

राज्यातील पोलिस महासंचालक कार्यालयात बनावट जातप्रमाणपत्राच्या आधारे जातीची चोरी करणाऱ्यांनी आदिवासी समाजाची बळकावलेली राखीव पदे, त्यातही बेपत्ता झालेल्या ३९८ पदांचा छडा लावून पदे भरण्याचे आव्हान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्यमंत्री योगेश कदम (गृह शहरे ), राज्यमंत्री पंकज भोयर (गृह ग्रामीण) यांच्यापुढे आता उभे ठाकले आहे.

## एसटी परिवहन महामंडळाचा प्रवाशांच्या जीवाशी खेळ...

# शिवशाही बस चा टायर चालत्या प्रवासातच निघाला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती**

अमरावतीतून एक मोठी बातमी समोर आली आहे. अमरावतीवरून नागपूरला जाणाऱ्या भरधाव शिवशाही एसटी बसचं पुढचं टायर आपोआप निघाल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. भरधाव वेगात असलेल्या शिवशाही बस नागपूरच्या दिशेने जात असताना ही घटना घडली. शिवशाही बसचं पुढचं टायर निघालं सुदैवाने यामध्ये प्रवास करणाऱ्या ५० प्रवाशांचा जीव थोडक्यात बचावला आहे. घडलेल्या घटनेचे सोशल मीडियावर फोटो आणि व्हिडीओ व्हायरल होत आहेत. त्यामुळे एसटी परिवहन महामंडळाचा प्रवाशांच्या जीवाशी




खेळ सुरू आहे का? असा सवाल केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अमरावतीवरून नागपूरला जाणाऱ्या भरधाव शिवशाही एसटी बसचं पुढचं टायर आपोआप निघून आलं. भरधाव बसचं टायर निखळल्यानंतर ते लांब अंतरावर गेलं. मात्र सुदैवाने ५० पेक्षा अधिक प्रवाशांचा थोडक्यात जीव वाचला. अमरावती नागपूर महामार्गावर ही धक्कादायक घटना घडली. काही दिवसांपूर्वी परतवाडा आगाराच्या बसचा ही अशाच प्रकारे टायर निघून आल्याचा प्रकार पाहायला मिळाला होता. सातत्याने घडणाऱ्या अशा घटनांनंतर एसटी महामंडळाचे बसच्या मेंटेनन्सकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होतोय.

# राज्यस्तरीय चित्र व शिल्प प्रदर्शनीला मिळतोत प्रतिसाद....







**विदर्भ प्रजासत्ताक , दि.१७अमरावती** डॉ भाऊसाहेब देशमुख ललित कला अकादमी आयोजित राज्यस्तरीय चित्र व शिष्य प्रदर्शन अमरावती २०२५ ललित कला अकादमी मध्ये १९८९ पासून चित्र व शिल्प प्रदर्शनाचे आयोजन करत असतात यावर्षी सदर प्रदर्शिन ललित कला भवन, रुक्मिणी नगर येथे भरविण्यात आले आहे.या प्रदर्शनात एकुण १८पुरस्कार देण्यात आले काही पुरस्कार रोख व काही उत्तेजनार्थ देण्यात आले तर व्यवसाईक गटातुन सात पुरस्कार व विद्यार्थी गटातुन सात पुरस्कार देण्यात आले.

# शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रशेखर भोयर यांच्या उपस्थितीत चांदूरबाजार येथे सहविचार सभा संपन्न, शिक्षकांचा प्रचंड प्रतिसाद





**विदर्भ प्रजासत्ताकदि.१७चांदुर बाजार–** चांदूरबाजार येथील सहविचार सभेत शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रशेखर भोयर (शेखरभाऊ) यांनी मार्गदर्शन करत असताना शिक्षकांच्या असलेल्या समस्या बाबत चर्चा केली भविष्यात सर्वांना शाळा वाचविण्यासाठी व शिक्षकांचे अनेक प्रलंबित समस्या सोडण्याबाबत चर्चा करून मार्गदर्शन केले.

पुढील काळात ताकतीने आपण सर्वांना एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे येणारी शिक्षक मतदारसंघाची निवडणूक एक दीड वर्षांनी होणार आहे त्यामध्ये आपण मागील निवडणुकीत जी चूक केली आणि अकार्यक्षम असा लोकप्रतिनिधी आपण निवडून दिला पण शिक्षक बांधवांची एकही समस्या शासन दरबारी विधानमंडळात मांडली नाही आज सरकारचे घातक असे शासन निर्णय निघत आहेत त्यामुळे येणाऱ्या काळात मराठी शाळा वाचतील की नाही हे सांगता येत नाही शिक्षकांना सरसकट निवडश्रेणी नाही कॅशलेस मेडिकल योजना नाही १०,२०,३० ही पदोन्नती नाही यासारखे अनेक प्रश्न सोडण्यासाठी व मांडण्यासाठी आपला हक्काचा माणूस विधान भवनात असला पाहिजे असे देखील मत बोलताना त्यांनी व्यक्त केले...या सभेच्या प्रसंगी गावंडे सर, राहुल मोहोड सर, नांदुरकर सर,गुजरकर सर,इकबाल सर तालुका अध्यक्ष श्री.मनोज तायवाडे,सचिव संतोष भोरे,प्रणित देशमुख,हेमंत सिनकर,मनोज पोकळे,सचिन बोराळकर,अमोल ठाकरे, गजानन ठाकरे, देवतळे सर, गावंडे सर ,खापरे सर ,पारधी सर,अहिर सर,इंगोले सर,बर्वे सर,मसूद काझी सर, धूर्वे सर व इतर सर्व सहकारी उपस्थित होते.

# 'माझी वसुंधरा' अभियानावर संशय, गैरप्रकार करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१७ नांदगावखंडेश्वर** ,नगरपंचायत अंतर्गत राबवित असलेल्या 'माझी वसुंधरा' अभियानात झालेल्या गैरप्रकाराची चौकशी करून संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर कारवाई करण्याची मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

माझी वसुंधरा अभियान २.० अंतर्गत उच्चतम कामगिरी करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना बक्षिसे रक्कमेचे वितरण व बक्षीस रकमेच्या विनियोगाची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली होती. त्या अंतर्गत नांदगावखंडेश्वर नगरपंचायतला एक कोटी रुपये बक्षीस प्राप्त आहे. बक्षीस विनियोगाची कार्यपद्धती, निसर्गाच्या पंचतत्त्वाचे संरक्षण, संवर्धन व जतन करण्यासाठी उपाययोजना नगरपंचायतने हाती घेतली.चार संस्थांशी मार्च २०२४ मध्ये करारनामा करून कामाला सुरवात करण्यात आली. पण प्रत्यक्षात ११ महिन्यांनंतर नगरपंचायत अंतर्गत माझी वसुंधरा अभियान २.० ची अंमलबजावणीच्या संदर्भात कुचकामी ठरली. ज्या भागात झाडे लावली ती पाण्याअभावी ११ महिन्यांत सुकल्याचे दिसते. त्या झाडांचे संगोपन, संवर्धन करण्यात आले नाही. लोखंडी ट्री गार्ड लावले नाही. या अंतर्गत नदी, नाले, तलाव यांचे पुनरूज्जीवन करणे, सौंदर्यकरणाचे उपक्रम राबविणे, रोपवाटिका निर्मित करणे, यासारखे कुठलेही काम माझी वसुंधरा अभियानांतर्गत झाले नाही,असा आरोप जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आला. त्याबाबत सखोल चौकशी करून संबंधितांविरुद्ध कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. वसुंधरा योजनेमध्ये गैरप्रकार झाल्याची तक्रार माझ्याकडे आली. मी तक्रारीत नमूद असलेले सर्व वृक्ष लावलेल्या ठिकाणाची पाहणी करणार आहे. या कामात कोणी गैरप्रकार केला असेल तर त्यावर नियमाप्रमाणे कार्यवाहीकरण्यात येईल. –**निवृत्ती भेलकर मुख्याधिकारी,** नगरपंचायत, नांदगाव खंडेश्वर.

# तत्कालिन सरकारने आदिवासी शेतकऱ्यांची केली होती फसवणूक

## वचनपूर्ती मेळाव्यातुन चव्हाण यांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७ अचलपूर:–** धारणी तालुक्यातील गडगा प्रकल्पा अंतर्गत येणाऱ्या मान्सुधावडी येथे रविवारी विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्या वतीने वचनपूर्ती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी मुख्य मार्गदर्शक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनोज चव्हाण.जेष्ट मार्गदर्शक राजाभाऊ काळे, समाजसेवक एड.बंड्या साने,संजय गिद,मनोज तंबाखे.भुषण चौधरी, दिलिप कदम,एड.ब्रदर जोश, राजेश जावरकर प्रामुख्याने उपस्थित होते.

या मेळाव्याचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून संघटनेचे संस्थापक अध्यक्ष चव्हाण यांनी उपस्थित प्रकल्पग्रस्तांना मार्गदर्शन करताना सांगितले की.विदर्भातील जलसिंचनाचा अनुशेष भरून काढण्यासाठी तत्कालीन सरकारने विदर्भात २०० हुन अधिक प्रकल्पांना मान्यता प्रदान केली व येथील शेतकऱ्यांची फसवणूक करत १८९४ चां भूसंपादन कायदा कायदा अस्तित्वात असताना सुद्धा ६ जून दोन हजार सहाला सरळ खरेदीचा काळा जि.आर. पारित केला व विदर्भातील शेतकऱ्यांच्या जमिनी विविध प्रकल्पांसाठी अत्यंत कवडीमोल भावाने सरळ खरेदी पद्धतीने खरेदी करून घेतल्यात तथा शेतकऱ्यांचे न्यायालयात जाण्याचे सवैधानिक अधिकार सुध्दा हिरावून घेतले.ज्या शेतकऱ्यांनी धरणं उभी करण्यासाठी सरकारला मदत केली अशांना ३८ हजार ते एक लाख रुपये दर देण्यात आला ज्यांनी सरकारला जमीनी दिल्या नाहीत अशा शेतकऱ्यांना मात्र १२ ते १८ लाख रुपये दर दिला.मात्र सरकारला मदत करणाऱ्या शेतकऱ्यांवर तत्कालीन सरकारने प्रचंड अन्याय केला.असल्याचे ते बोलत होते. धारणी तालुक्यातील अंबापाटी गडगा,व अन्य प्रकल्पांसाठी येथील आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी सरळ खरेदी पद्धतीने अत्यंत कवडीमोल दराने खरेदी करून घेतल्यात व त्यांना भुमीहीन करुन वाऱ्यावर सोडले वास्तविक पाहता आदिवासींना भुमिहीन करता येत नाही.परंतु तत्कालीन जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी आदिवासी शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांची कायदेशीर फसवणूक केली असल्याचे चव्हाण यांनी बोलताना सांगितले.ते पुढे म्हणाले की.या संदर्भात स्थानिक मतदार संघाचे आमदार व



आदिवासींच्या मतांवर डल्ला मारणाऱ्या राजकीय स्वार्थी नेत्यांनी या अन्यायाविरुद्ध आवाज का उठवला नाही.तर विदर्भातील एकाही जनप्रतिनिधींनी या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला नव्हता. महाराष्ट्राच्या सदनामध्ये ६ जून २००६ ला हा काळा जि.आर.पारीत होत असताना येथील जनप्रतीनीधींनी आपल्या डोळ्यांवर पट्टी बांधून घेतली होती का असाही प्रश्न चव्हाण यांनी उपस्थित केला .सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या विदर्भातील हजारो शेतकऱ्यांवर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी गेल्या दहा वर्षांपासून ऐतिहासिक संघर्ष विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्या माध्यमातून केला जात असुन विदर्भातील प्रकल्पग्रस्तांची संघटीत शक्ती मनोज चव्हाण यांच्या नेतृत्वात आंदोलनाची धार तेज करीत असतानाच अखेर महायुतीच्या सरकारने याची दखल घेऊन सरळ खरेदी धारक शेतकऱ्यांना २४ सप्टेंबर २०२४ ला झालेल्या नियामक मंडळाच्या बैठकीत ८३२ कोटी रुपये सानुग्रह अनुदाला मंजूरात देऊन प्रकल्पग्रस्तांना थोड्या प्रमाणात दिलासा देत सोबतच संघटनेच्या मागणी नुसार अमरावती येथे भूसंपादन प्राधिकरणाला मान्यता देत. प्रकल्पग्रस्तांसाठी आर्थिक विकास महामंडळाला सुध्दा मान्यता देण्यात आली असून लवकरच प्रकल्पग्रस्तांना याचा फायदा मिळणार आहे . सध्या स्थीतीत पैसै काढून देण्यासाठी काही दलाल फीरत असुन आदिवासी बांधवांनी अशा चोरांच्या जाळ्यात अडकु नये असा सल्लाही चव्हाण यांनी दिला आहे.विविध जिल्ह्यात वचनपूर्ती मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे.

# नागपूरच्या रेल्वे स्थानकावर दिल्लीच्या घटनेची पुनरावृत्ती टळली




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि१७नागपूर :–** नागपूर रेलवे स्थानकावर रविवारी दुपारी मोठी दुर्घटना टळली. मुख्य मार्गिकेवरील मालगाडीला जोडलेल्या टँकरला आग लागल्याने खळबळ उडाली. मालगाडीला जोडलेला डीजल टँकर मध्य प्रदेशातील रतलाम जिल्ह्यातून चंद्रपूर जिल्ह्यातील तडाली येथे जणार होता. त्याला नागपूर रेल्वे स्थानकावर आग लागली. याची माहिती मिळताच रेल्वेचे अधिकारी ही आग विझवण्यासाठी प्रयत्न करू लागले. ज्यावेळी ही घटना घडली त्यावेळी फलाटावर तेलंगाना एक्सप्रेस उभी होतीा. ही आग मालगाडीला जोडलेल्या डिझेल टँकरपर्यंत पोहोचली असती तर अनर्थ घडला असता. पण रेल्वे अधिकाऱ्यांनी तत्काळ पावले उचलल्याने ही दुर्घटना टाळली.रतलाम येथून चंद्रपूर जिल्ह्यातील ताड़ालीला जाणाऱ्या मालगाडीला तेल टैंकर जोडण्यात आला होता. मालगाड़ी दपारी ३..४५ वाजता नागपूरच्या रेल्वे स्थानकावरील फलाट क्रमांक १ आणि २ च्या मुख्य मार्गिकेवर उभी होती. तेव्हा मालगाडीला अचानक आग लागल्याचे निदर्शनास आले. थोड्याच वेळात आगीची व्याप्ती वाढली. आगीने फलाटाच्या दोन्ही बाजूने लागलेल्या लाकडी शेडला कवेत घेतले.ज्यावेळी ही घटना घडली त्यावेळी फलाट क्रमांक एकवर तेलंगाना एक्स्प्रेस उभी होती. रेलवे सुरक्षा दलाच्या जवानांनी त्वरित अग्निशमन दलाच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. तसेच महापालिकेच्या अग्निशमन दलाला घटनेची माहिती दिली. अग्निशमन दलाच्या गाड्या आल्यावर आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. त्यामुळे नागपूर रेल्वे स्थानकावरील मोठी दुर्घटना टळली. फलाटावरील घडामोडींचा अंदाज घेतल्यावर तेलंगाना एक्स्प्रेसला पुढे जाऊ देण्यात आले आणि आगग्रस्त मालगाड़ीला अजनी यार्डमध्ये पाठवण्यात आले.दरम्यान मालगाडीला आग लागल्याचे लक्षात येताच रेल्वे स्थानकावर एकच गोंधळ उडाला होता. तेथे उपस्थित प्रवाशानामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. कारण त्यांना फलाटावर उभ्या असलेल्या तेलंगाना एक्स्प्रेसम ध्येच आग लागली असा समज झाला. त्यामुळे काही वेळापर्यंत स्थानकावर अफरा तफरी माजली होती. परंतु काही काही काळाने ही आग मालगाडी तील असल्या चे स्पष्ट झाले.

# आधार कार्डासाठी विद्यार्थ्याला १२ हजारांचा फटका
## परीक्षेपासूनही राहिला वंचित, चार महिन्यांनी मिळाले कार्ड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७हिवरखेड–** आधार कार्ड हरविल्याने दुसरे आधार कार्ड काढण्यासाठी एका विद्यार्थ्याला तब्बल १२ हजार रुपये खर्च करावे लागले. इतकेच नाही तर नवीन आधार कार्ड वेळेवर न मिळाल्याने त्या विद्यार्थ्याला पदवी परीक्षेलाही बसता आले नाही. या सर्व प्रकारामुळे त्या विद्यार्थ्याला व त्याच्या कुटुंबीयांना आर्थिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागले.गौरव राजेंद्र काळे (रा. हिवरखेड, ता. मोर्शी), असे त्या विद्यार्थ्यांचे नाव आहे. गौरवचे काही दिवसांपूर्वी आधार कार्ड हरविले, त्यामुळे तो दुसरे आधार कार्ड काढण्याकरिता सेतू केंद्रावर गेला. परंतु त्याच्या आधार कार्डला मोबाईल नंबर लिंक नसल्यामुळे त्याचे आधार कार्ड निघू शकले नाही. त्यानंतर त्याने गावातच हिवरखेड येथे आधार कार्ड अपडेट करण्यासाठी तीन वेळा प्रयत्न केले. परंतु यश आले नाही. त्यानंतर गौरव ने वरुड येथे




जाऊन सुद्धा प्रयत्न केले. परंतु आधार कार्ड निघू शकले नाही. गौरवणे अखेर जिल्हाधिकारी कार्यालय गाठले. तेथून त्याला माहिती मिळाली की, मुंबईला आधार कार्ड नोंदणीचे मुख्य कार्यालय आहे. त्यानंतरं गौरवणे थेट मुंबई येथील मुख्य कार्यालय गाठले. मात्र तेथे सुद्धा त्याचे कार्ड तयार झाले नाही. त्यानंतर पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालयातूनच आधार कार्ड तयार करण्याकरिता त्याने प्रयत्न केले. कारण आधार कार्डशिवाय त्याला पदवीपरीक्षेला ही बसतात येणार नव्हते. अखेर साडेतीन ते चार महिन्यांनंतर गौरवचे आधार कार्ड घरपोच आले. मात्र आधार कार्ड नसल्यामुळे त्याला महाविद्याल यात प्रवेश चडएठ झजठढ मिळाला नाही आणि परीक्षेलाही बसता आले नाही. सोबतच आधार कार्ड काढण्यासाठी त्याला जवळपास १२ हजार रुपयांचा खर्च आला. आधार कार्ड काढणे करावे सुलभआधार कार्ड काढणे डोकेदुखी असल्याचे मानत हिवरखेडसह बऱ्याच ठिकाणच्या ग्रामस्थांनी आधार कार्ड काढले नाही. त्यामुळे आधार कार्ड काढणे ही प्रक्रिया सुलभ व सरळ करण्याची मागणी गावकऱ्यांकडून केली जात आहे.

# कृषी विभागाच्या प्रशिक्षण सभागृहाला आग





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**
जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय परिसरात असलेल्या प्रशिक्षण हॉलला रविवारी सायंकाळच्या सुमारास अचानक आग लागली. घटनेची माहिती मिळताच महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या पथकाने तातडीने घटनास्थह आग आटोक्यात आणली.

यामध्ये हॉल मध्ये ठेवलेले साहित्य जळून खाक झाले.कृषी अधीक्षक कार्यालयाचे शंभर क्षमतेचे प्रशिक्षण हॉल आहे. यामध्ये काही जुने तुटलेले फर्निचर, तसेच निकृष्ट दर्जाच्या काही कॉटन बॅग, यासह जुने कागदपत्रे ठेवण्यात आले आहे. रविवारी सायंकाळी या सभागृहालाअचानक आग लागली. कृषी विभागाच्या वतीने सायन्सकोर मैदान येथे कृषी प्रदर्शन सुरू आहे. त्यामुळे कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी त्या ठिकाणी कार्यरत आहे. तसेच रविवार असल्याने केवळ चौकीदारच येथे कामावर होता.

सभागृहाला आग लागल्याची माहिती चौकीदाराने अग्निशमन दलाला दिली. या घटनेत संबंधित सर्व साहित्य जळून खाक झाले. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली असल्याची शक्यता कृषी अधीक्षक राहुल सातपुते यांनी व्यक्त केली.

# किरण नगर नरसम्मा महाविद्यालय प्रांगणावर अवतरी शेगाव नगरी...

## श्री गजानन विजय ग्रंथाचे सामूहिक पारायण

### विद्याताई पडवळ यांच्या सुश्राव्य वाणीतून ग्रंथवाचन
### महिलांसह हजारो गजानन भक्तांचा उत्साहाने सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**
जय जयाजी राघवा रामा । जय जयाजी मेघ:श्यामा ।संतजनांच्या विश्रामा । सीतापते दाशरथे ॥ १॥तुझ्या कृपेनें वानर । बलिष्ठ झाले भूमीवर ।ज्यांनीं रावणाचा चक्काचूर । केला देवा लंकेवरी ॥ २॥तुझी कृपा झाल्या पाही । तो सर्वदा होतो विजयी ।जें जें इच्छील तें तें नेई । काम आपलें तडीला ॥ ३॥ .... संकष्ट चतुर्थीच्या शुभ दिनी ठाणे येथील सौ विद्याताई पडवळ यांच्या अमृततुल्य वाणीद्वारे हजारो महिलांसह गजानन भक्तांचे श्री गजानन विजय ग्रंथाचे सामूहिक पारायण मोठ्या भक्तीमय वातावरणात पार पडले. श्री संत शिरोमणी गजानन महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने 'सेवा हीच साधना' हा मंत्र जोपासत माजी नगरसेवक तसेच डॉ. पंजाबराव देशमुख बँकेचे माजी अध्यक्ष, संचालक राजेंद्र महल्ले यांच्या पुढाकाराने या ह भ प दासगणू महाराज लिखित श्री गजानन विजय ग्रंथाचे मुखोद्गत सामूहिक पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर हजारो भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.सकाळी ६.१५ वा. शुभारंभ

पारायणला सकाळी ठिक सहा वाजता विद्याताई पडवळ यांच्या सुश्राव्य वाणीतून मुखोद्गत श्री गजानन विजय ग्रंथाचे सामूहिक पारायण सुरु झाले. श्रीगणेशाय नम: ॥ जयजयाजी उदारकीर्ती । जयजयाजी प्रतापज्योती । जयजयाजी हे गणपती ! । गौरीपुत्रा मयूरेश्वरा ! ॥१॥ कार्यारंभीं तुझें स्मरण । करित आले जन । मोठमोठाले विद्वान । साधुसंत सत्पुरुष ॥२॥ तुझ्या कृपेची अगाध शक्ति...विद्याताई पडवळ यांच्या अमृततूल्य वाणीतून एकापाठोपाठ




एक अशा ओळी पारायण मंडपात गुंजत असताना उपस्थित हजारो गजानन भक्तांनी त्यांना साथ देत,एका पाठोपाठ एक अशा अध्यायाचे वाचन केले. संत गजानन महाराजांच्या कथा लिलांच्या भक्तीमय सुरांनी पारायण मंडप परीसरातील वातावरण जणू शेगाव नगरी अवतरल्यासारखे झाले होते.सकाळी ठिक ६.३० वाजता पारायणाला सुरुवात झाल्यानंतर प्रथम विश्रांती सातव्या अध्यायानंतर पंधरा मिनिटांसाठी घेण्यात आली. या दरम्यान महिलांसह सर्व वाचकांसाठी चहा पाण्याची व्यवस्था करण्यात आली. ८ ते १४ अध्यायानंतर व्दितीय विश्रांती पंधरा मिनिटांसाठी घेण्यात आली. यावेळी भक्तांना फराळ वाटप करण्यात आले. त्यानंतर दुपारी २.३० वाजता २१ अध्यायानंतर पारायण समाप्ती झाल्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाआरती करण्यात आली.पारायण मंडपात भव्य क्रिर नची सुद्धा व्यवस्था करण्यात



आली होती.हजारो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभमहाआरती झाल्यानंतर लगेच पारायण मंडपाच्या बाजुलाच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने उपस्थित सेवकांनी महाप्रसादाची व्यवस्था करून वितरण केले. रांगेत उभे राहून महाप्रसादाची पत्रावळी घेतल्यानंतर मंडपात ठिकठिकाणी महाप्रसादाचे वितरण सेवेकरींच्या हस्ते करण्यात आले.सकाळी ६ वाजतापासून सुरु झालेल्या या पारायण सोहळ्या दरम्यान सायंकाळपर्यंत खा. अनिल बोंडे , आ. रवी राणा, माजी खा.अनंत गुढे, माजी राज्यमंत्री वसुधाताई देशमुख, माजी महापौर विलास इंगोले, मनपा आयुक्त सचिन कलंत्रे,सौ. स्नेहा कलंत्रे,शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले,प्रितीताई बंड,अंजली पांडे,राजूभाऊ भेले,अविनाश मार्डीकर,सुरेश रतावा,गजानन राजगुरे, नंदूभाऊ गुगळे, माजी नगरसेवक प्रदीप हिवसे, कैलास गिरवळकर, पंकज देशमुख राम महाजन, राजीव राठी, प्राचार्य चंदन पाटसर, सुनील सरोदे, चंदूभाऊ पवार यांच्यासह अनेक मान्यवरांनी पारायण सोहळ्याला उपस्थिती दर्शवित महाआरतीचा लाभ घेतला. पारायण सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी श्री संत शिरोमणी गजानन महाराज सेवा समितीच्या समस्त पदाधिकाऱ्यांनी व सेवेकरींनी अथक परीश्रम घेतले.आरोग्य सेवा आणि चप्पल स्टँडची व्यवस्थाउल्लेखनीय म्हणजे शेगाव नगरीत संत गजानन महाराजांच्या दर्शनाला गेल्यानंतर प्रथम सर्वच भाविकांची पादत्राणे ठेवण्यासाठी टोकन देत चप्पल स्टँडची व्यवस्था करण्यात आली आहे. अगदी त्याच धर्तीवर पारायण सोहळा मंडपाच्या परीसरात चप्पल स्टँडची व्यवस्था करण्यात आली होती. पारायणाला बसेलेल्या प्रत्येक भाविकांची पादत्राणे त्या ठिकाणी व्यवस्थित रित्या ठेवून प्रत्येकाला कूपन देण्यात आले. त्यामुळे पारायण सोहळा मंडपात कुठेही चपला पडलेल्या दिसत नव्हत्या,हे विशेष.त्यात आणखी म्हणजे अखंड पारायण सोहळा असल्या कारणामुळे दरम्यान ,एखाद्या वाचक भाविकाला जर काही प्रकृतीची अडचण आली,तर त्यावर तत्काळ प्राथमिक उपचार करण्यासाठी एक वैद्यकीय चमू सुद्धा दिवसभर पारायण स्थळी जातीने हजर होती.

# ऑनलाइन बिझनेसच्या नावावर १.९४ लाखाने गंडविले
## फ्रेजरपुरा ठाण्याच्या हद्दीतील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती :**
ऑनलाइन बिझनेसच्या नावावर एका इलेक्ट्रिशियनला १ लाख ९४ हजार रुपयांनी गंडविण्यात आले. ही घटना शनिवार, १५ फेब्रुवारी रोजी फ्रेजरपुरा ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. या प्रकरणी तक्रारीवरून अज्ञात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

पोहरा येथील रहिवासी चंद्रशेखर गोलाईत (४९) यांना सोशल मीडिया प्लॅटफार्मवर एक मेसेज प्राप्त झाला. ऑनलाइन बिझनेस करण्यास तयार आहे का, अशी विचारणा त्यांना मेसेजमधून करण्यात आली. त्यावर काय करावे लागेल,असे गोलाईत यांनी विचारले. त्यावेळी ऑनलाइन रुम्स रिझर्व्हेशन करून २५ रुम्स बुक केल्यावर त्यावर पैसे मिळेल, अशी बतावणी ठकसेनाने गोलाइत यांच्याकडे केली. त्या रूम्स बुक केल्यानंतर त्यांच्या खात्यात काही




रक्कमदेखील जमा झाली. सोबतच, सोशल मीडिया प्लटफॉर्मवर अनेक लोक आपल्या खात्यात पैसे जमा झाले, असे मेसेज करत असल्याने गोलाइत यांचा त्यावर विश्वास बसला. पुढील टास्क पूर्ण केल्यानंतर गोलाईत यांच्या खात्यातही पैसे जमा झाले. त्यामुळे गोलाइत यांनी नवीन टास्ककरिता ठकसेनांच्या मोबाइलवर १ लाख ८४ हजार ६६१ रुपये पाठविले. परंतु, ठकसेनांनी भरलेली एकूण रक्कम व त्यावरील कमिशन देण्यास त्यांना नकार दिला. उलट टास्कच्या आड पुन्हा अतिरिक्त पैशांची मागणी होऊ लागली. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे गोलाईत यांच्या लक्षात आले. त्यामुळे ४ जानेवारी रोजी त्यांनी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतरही त्यांचे रक्कम परत मिळण्यासाठी सोशल मीडिया प्लॅटफार्मवर ठकसेनांसोबत बोलणे सुरू होते. त्यावेळी ठकसेन महिलेने त्यांना केवळ एकदा १० हजार रुपये भरा व तुमची संपूर्ण रक्कम परत घ्या, अशी बतावणी त्यांना केली. त्यामुळे त्यांनी १७ जानेवारी रोजी पुन्हा ठकसेन महिलेच्या खात्यात १० हजार रुपये पाठविले. मात्र, त्यानंतरही त्यांना रक्कम परत मिळाली नाही. त्यामुळे त्यांनी १५ फेब्रुवारी रोजी फ्रेजरपुरा ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

# नागपूर येथील लेखिका सौ. गायत्री मुळे यांना दोन प्रमुख पुरस्कारांने सन्मानित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ पुणे** – मराठी वांगमय परिषद, बडोदा आयोजित अखिल भारतीय साहित्य स्पर्धेचा द्विदिवसीय सोहळा ९ फेब्रुवारी रोजी श्रीमती चिमणाबाई हायस्कूल, बडोदा येथे संपन्न झाला. या कार्यक्रमात नागपूर येथील लेखिका सौ. गायत्री मुळे यांना दोन प्रमुख पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. त्यांच्या वास्तुपुरुष ह्या कादंबरीला अखिल भारतीय स्तरावर सर्वोत्कृष्ट कादंबरी म्हणून प्रथम क्रमांक मिळाला, तसेच त्यांच्या हस्तलिखित ह्या कथेसाठी सुद्धा त्यांना प्रथम क्रमांक मिळाला.

गायत्री मुळे ह्या लेखिकेची ही चौथी कादंबरी आहे. पानगळ, पारो आणि परब्रह्म ह्या तीन यशस्वी कादंब–या नंतर त्यांनी वास्तुपुरुष ह्या कादंबरीला शब्दबद्ध केले. विशेष म्हणजे, वास्तुपुरुष कादंबरीला बडोदा येथील पुरस्कार मिळाल्यानंतर आता या कादंबरीला एकूण पाच पुरस्कार प्राप्त झाले आहेत. या कादंबरीला अद्याप खालील पुरस्कार प्राप्त झाले आहेत:– साहित्य विहार संस्था, नागपूर– स्पंदन चॅरिटेबल ट्रस्ट, कराड– शब्दकळा पुरस्कार, मंगळवेढा– प्रज्ञा बहु उद्देशीय साहित्य मंच, पुणे मराठी वांगमय परिषद, बडोदाअत्यंत उत्तम नियोजित समारंभात डॉ. उदयजी निरगुडकर यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.





# शाळकरी मुलांना सहलीला घेऊन जाणाऱ्या बसचे चाक निखळले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७परतवाडा :** शाळकरी मुलांना सहलीसाठी घेऊन जाणाऱ्या परतवाडा आगाराच्या एसटी बसचे चाक अचानक निखळले. हा प्रकार लक्षात येताच बसचालकाने प्रसंगावधान राखून बस थांबविल्याने पुढील अनर्थ टळला. ही घटना रविवारी रिद्धपूरजवळ घडली.

परतवाडा शहरातील एका शाळेतर्फे रविवारी विद्यार्थ्यांच्या सहलीचे आयोजन करण्यात आले होते. परतवाडा आगाराच्या चार ते पाच बसेस या शाळकरी मुलांना सहलीसाठी घेऊन जात होत्या. मार्गात रिद्धपूरजवळ त्यातील एका बसच्या समोरील चाकातील किनपीन अचानक निसटून चाक तिरपे झाले. हा प्रकार चालकाच्या लक्षात आला.

धोका लक्षात येताच चालकाने तत्काळ बस रस्त्याच्या कडेला थांबविली. त्यामुळे पुढीलअनर्थ टळला.ही घटना घडली त्यावेळी बसमध्ये ४ शिक्षकांसह ५६ विद्यार्थी प्रवास करीत होते.लागोपाठ घडत असलेल्या या घटनांमुळे एसटी बसेसच्या देखरेख आणि स्थितीविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गेल्या आठ दिवसांत परतवाडा आगाराच्या बससोबत घडलेली ही दुसरी घटना आहे, हे येथे उल्लेखनीय. यापूर्वी, ९ फेब्रुवारी रोजी परतवाड्याहून पुण्याला जाणाऱ्या शयनयान बस क्रमांक एमएच १४ एलबी २३४४ चे चाक चिखलीजवळ निखळले होते. या घटनेनंतर तांत्रिक विभागातील दोन कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले होते.–



# ७२२ ग्रामपंचायतींमध्ये सरपंचपदाचे आरक्षण बदलणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

जिल्ह्यातील१२ तालुक्यांतील ७२२ ग्रामपंचायतीमध्ये थेट सरपंच पदाकरिता नव्याने आरक्षण काढण्याच्या सूचना आयोगकडून प्राप्त झाल्याने सद्या निवडणुक विभागात आरक्षणची लगबग सुरू झाली आहे. जिल्हा निवडणुक आयोगाकडून आरक्षणाबाबतची पूर्वतयारी सुरू करण्यात आली आहे. इतर तीन ग्रामपंचायतीचे आरक्षण आधीच काढण्यात आले आहे. केवळ तीन पैकी एका ग्रामपंचायतीमध्ये ओविसीप्रवर्ग बदलून सर्वसाधारण करण्यात आले आहे. मात्र मेळघाटातील धारणी आणि चिखलदरा तालुक्यात मात्र सरसकट अनुसूचित जमाती प्रवर्गांकरिता सरपर्च पद राखीव असणार असून तेथे महीला व किंवा पुरूष असेच आरक्षण काढले जातील,राज्यात आगानी ग्रामस्वातीच्या सार्वत्रिक निडणुकांमध्ये थेट सरपंचांची निवडणूक घेतली जाणार आहे. त्यामुळे आता नव्याने सर्वच ग्रामपंचायतीमध्ये सरपंच पदाकरिताआरक्षण करण्याबाबतचे आदेश आयोगाकडून प्राप्त झाले आहे. यापुर्वी ५ मार्च २०२० रोजी सरपंचपदाचे आरक्षण कारण्यात आले होते.या आरक्षणची मुदत ४ मार्च २०२५ मध्ये संपत आहे. त्यामूळे पुढील मार्च २०३० पर्यंत सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्याबाचतच्या सुचना आयोगाकडून जिल्हा प्रशासनाला प्राप्त झाल्या आहेत. या अनुषंगाने ग्रामिण भागातील एकूण लोकसंख्या, हामपंचायतीची संख्या, अनुसूचितजाती, जमातीची लोकसंख्या आणी टक्केवारी आदी प्रकारची माहीती प्रानपंचायींकड्न सादर केली जात आहे. त्यामुळे जिल्ह्यात निवडणूक विभागामध्ये आरक्षणाची लगबग तर ग्रामपंचायतींमध्ये आरक्षणाची उत्सुकता लागली आहे.



### यंदा ओबीसींच्या जागा घटणार

यापूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये इतर मागास प्रवर्गाला २७ टक्के आरक्षण होते. त्यामुळे अनुसूचित जाती, जगातीपेक्षाही ओबीसींचा आकडा अधिक होता. परंतू समर्पित आयोगाच्या शिफारशीनुसार सर्व आरक्षण हे ५० टक्केच्या आत घेण्याबाबतचे आदेश असल्याने सरपंच पदाकरिता देखील ओबीसी प्रवर्गाच्या ५० टक्के जागा घटणार आहे.

जिल्ह्यात १४ तालुक्यापैकी मेळघाटातील धारणी आणि चिखलदरा या दोन तालुक्यात अनुसूचित जमातीकरिता सरपंचपद राखीव असणार आहे. त्यामुळे १२ तालुक्यांतील ८४१ पैकी ७२५ ग्रामपंचायतीमध्ये अनुसुचित जाती अनुसूचित जमाती व इतर मागास आदी जणांकरिता आरक्षण काढले जाणार आहे.७२५ पैकी शहापुर, जरूड आणि खेलदेवमाळी या तीन ग्रामपंचायत सरपंचपदाचे आरक्षण आधीच काढण्यात आले आहे. यामध्ये शहापुर येथील ओबिसीचे आरक्षणात बदल कारित ते सर्वसाधारण करण्यात आले आहे. त्यामुळे ७२२ ग्रामपंचायतीमध्ये सरपंचपदाच्या आरक्षणात इतर मागास प्रवर्गाला किती जागा मिळतात याकडे लक्ष लागले आहे. सरपंचपदाचे स्वप्न पाहणाऱ्या उमेदवारांना देखील आता आरक्षणाची उत्सुकता लागली आहे.

# ...तर 'आरटीई'चे शुल्क पालकांकडून वसुलणार
## खासगी शाळा संचालकांचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

बालकांच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम (आरटीई) अंतर्गत खासगी शाळांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचे अनुदान शासनाकडे थकीत आहे. त्यामुळे शासनाने तातडीने अनुदान न दिल्यास विद्यार्थ्यांच्या पालकांकडूनच सदर शुल्क वसूल करू, असा इशारावजा भूमिका आता खासगी इंग्रजी शाळांच्या संघटनेने घेतली आहे. त्यामुळे पालकांसमोर मोठे आर्थिक व मानसिक संकट उभे राहण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

महाराष्ट्र इंग्रजी शाळा संस्थाचालकांची संघटना (मेस्टा) चे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय तायडे यांच्या नेतृत्वात शनिवारी अमरावतीत बैठक पार पडली. त्यावेळी हा निर्णय घेण्यातआला. आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास घटकांतील पाल्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी खासगी विनाअनुदानित शाळेत शासनाकडून २५ टक्के जागेवर मोफत प्रवेश दिले जातात. त्या विद्यार्थ्यांचे शुल्क शासनाकडून शाळांना दिले जाते. सध्या आरटीईच्या माध्यमातून प्रवेश प्रक्रिया सुरू असून, ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण झाली आहे; परंतु जवळपास १० वर्षांपासून राज्यभरातील शाळांचे अनुदान शासनाकडे थकले आहे. त्यामध्ये अमरावती जिल्हयातील २५१ हुन अधिक शाळांच्या जवळपास ६० ते ७०कोटी रुपयांचा समावेश आहे. त्यामुळे आता सुरू असलेल्या प्रवेशप्रक्रियेतंर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यावर त्यांचे शुल्क पालकांकडून घेतल्या जाईल. त्यानंतर शासनाकडून शुल्काची रक्कम मिळाल्यावर ती रक्कम पालकांना परत केली जाईल किंवा शासनानेच पालकांच्या खात्यात ती रक्कम जमा करावी, अशी मुख्य भूमिका मेस्टाने घेतली आहे. पत्रपरिषदेत डॉ संजय तायडे यांच्यासह अनिल आसलकर, अभिजित देशमुख, लक्ष्मण जाधव, मनिष हांडे, किरण चौधरी आदी उपस्थित होते.




> शुल्काच्या थकीत रकमेसाठी शासनाकडे पाठपुरावा करता येईल, परंतु शुल्काच्याबाबतीत शाळांना अशाप्रकारे भूमिका घेता येणार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे त्यामुळे उल्लंघन होऊ शकते. परिणामी, शाळांनी पालकांकडून शुल्क वसूल केल्यास त्यांच्यावर कारवाई केल्या जाईल.
> **अरविंद मोहिरे, प्राथमिक शिक्षणाधिकारी, जि.प.**

# २३ पासून सालबर्डीसाठी धावणार९५० लालपरी
## महिला, ज्येष्ठ व अमृत नागरिकांना सवलती लागू राहणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती**



महाशिवरात्रीनिमित्त जिल्ह्यातील सालबर्डी व कोंडेश्वर येथे भक्तांची गर्दी पाहता एसटी महामंडळाकडून यात्रेकरुंच्या सुविधेकरिता लालपरी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. गतवर्षीच्या तुलनेत बस फेर्याची संख्या वाढविण्यात आली असून २३ फेब्रवारीपासून २ मार्चपर्यंत लालपरी यात्रेकरूंच्या सेवेत उपलब्ध राहणार आहे.

महाशिवरात्री निमित्त जिल्ह्यातील सालबर्डीला विदर्भातील हजारो भक्तांचा जनसागर लोटतो. प्रवासाच्या सुविधेअभावी भक्तांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होते. जिल्ह्यातील ८ बसस्थानकामधून प्रत्येकी १० बसेस उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. गतवर्षी८७३ बस फेर्या करण्यात आल्या होत्या.त्यातून महामंडळाला २२ लाखांचे उत्पन्न मिळाले होते. यावर्षी बस फेर्या वाढविण्यात आल्या असून ९५० करण्यात आल्या आहेत. त्यातून राज्य मार्ग परिवहन महामंडळाला ३२ लाख उत्पन्न अपेक्षित आहे.

सर्व सवलती मिळणारमहामंडळाने इतर प्रवासात महिलांना भाड्यात ५० टक्के सवलत, यासह ज्येष्ठ व अमृत नागरिकांकरितासुध्दा जी सवलत दिली आहे, ती सर्व सवलत या यात्रा महोत्सवामध्येसुध्दा यात्रेकरूंना देण्यात येईल.


# झोननिहाय सफाई कंत्राटाबाबत न्यायालयात होणार सुनावणी
## डावलण्यात आलेल्या निविदाधारकाची याचिका प्रशासनाला मागितले उत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

झोननिहाय सफाई कंत्राटाच्या निविदा प्रक्रियेतून डावलण्यात आल्याच्या कारणावरून एका निविदाधारकाने न्यायालयात धाव घेतली होती. त्या निविदाधारकाने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या आधारे उत्तर सादर करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. याप्रकरणी येत्या काही दिवसांत सुनावणी होणार आहे.

महापालिका प्रशासनाने शहरात २०२३ पासून झोननिहाय सफाई कंत्राटाची पद्धत स्वीकारली आहे.

त्यासाठी पाच झोनमध्ये पाच कंत्राटदार नेमण्यात आले. त्यावेळी राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेतून अशोका एंटरप्रायजेस नामक निविदाधारक कंपनीला बाद करण्यात आले होते; मात्र त्या निविदाप्रक्रियेवर अशोका एंटरप्रायजेस कंपनीकडून आक्षेप नोंदविण्यात आला. प्रामुख्याने दस्तूरनगर झोनअंतर्गत नेमण्यात आलेल्या कंत्राटदाराला अंजनगाव सुर्जी नगरपरिषद प्रशासनाने काळ्या यादीत टाकले असतानाही त्या कंपनीला महापालिकेने कंत्राट दिले आहे. तसेच कंत्राटाचा कालावधी पूर्ण होईस्तोवर 'ईएमडी'ची रक्कम परत करणे अपेक्षित नसतानाही सदर रक्कम कंत्राटदाराला परत करण्यात आली. मनुष्यबळ किती असावे, याबाबत या कंत्राटात कोणतेही बंधन नाही आणि त्यासाठी तांत्रिक मंजुरीही घेण्यात आली नाही, आदी अनेक आक्षेप अशोका एंटरप्रायजेस कंपनीने घेतले आहे. याबाबत काही दिवसांपूर्वीच सुनावणी नियोजित होती; मात्र प्रशासनाने उत्तर सादर करण्यासाठी आठवडाभराची वेळ मागितली होती. त्यामुळे येत्या आठवडाभरात याप्रकरणी पुन्हा सुनावणी होणार आहे. दरम्यान, सदर कंपनीच्या काही आक्षेपांमध्ये तथ्य असल्याचे बोलल्या जात आहे, त्यामुळे प्रशासन याप्रकरणी काय उत्तर सादर करते, याकडे लक्ष लागले आहे.



# उकाडा वाढल्याने फेब्रुवारीतच विजेच्या मागणीत वाढ
## गतवर्षीच्या तुलनेत ९ अंश ने वाढ




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

ग्लोबल वार्मिंगचा परिणाम जाणवू लागला आहे. जिल्ह्यात फेब्रुवारी महिन्यातच विजेच्या मागणीत लक्षणीय वाढ झाली आहे. कृषिपंपाचा वाढलेला वापर आणि तापमानवाढीमुळे निर्माण झालेला उकाडा यामुळे राज्यातील विजेची मागणी २७ हजार मेगा वॅटवर पोहोचली आहे. जिल्ह्यात उकाडा मोठ्या प्रमाणात वाढल्याने दिवसा व रात्री पंखे, एसीचा वापर सुरू झाल्याने फेब्रुवारी महिन्यात बिल वाढण्याची शक्यता आहे.यंदा फेब्रुवारीतच जिल्ह्याचा तापमान सातत्याने उच्चांक गाठत आहे. तापमानाचा परिणाम आरोग्यावर जाणवत आहे. त्यातच उकाडा वाढल्याने विजेची वापर मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येत आहे.बॉक्स

**रब्बी हंगाम सुरू कृषि पंपांकरिता वीजवापर वाढला**

जिल्ह्यात सध्या रब्बी हंगाम सुरू आहे. हरभरा, गहू, भाजीपाला व इतर रब्बी पिकांना पाणी द्यावे लागते. त्यामुळे कृषिपंपांकरिता वीजवापर वाढला आहे.

**उकाडा वाढताच विजेची मागणी आणखी वाढणार**

यंदा फेब्रुवारी सुरू होताच उकाडा जाणवत आहे. येणाऱ्या दिवसांत उकाड्यात आणखी वाढ होणार आहे. त्यामुळे कूलर, पंखे, 'एसी'चा वापर वाढणार असून, त्याकरिता विजेच्या मागणीतही वाढ होणार आहे. परिणामी, विजेच्या वाढत्या वापरानुसार वाढीव बिलही हाती पडणार आहेत.

# क्रीडा गुण सवलतीसाठी आता 'ऑनलाइन' कसरत ; दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांनो जाणून घ्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अकोला**

महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे घेण्यात येत असलेल्या दहावी व बारावीच्या परीक्षेत खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा गुणांची सवलत दिली जाते. यावर्षी क्रीडा गुण सवलतीमध्ये मोठे फेरबदल करण्यात आले आहेत. क्रीडा गुणांचा प्रस्ताव ऑफलाइनऐवजी ऑनलाइन सादर करावा लागेल. त्यासाठी विशिष्ट मुदत दिली असून मुदतीत ऑनलाइन प्रस्ताव सादर न केल्यास क्रीडा गुणांपासून खेळाडू विद्यार्थी वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**खेळांमध्ये आवड निर्माण व्हावी म्हणून**

शालेय विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतल्यामुळे क्रीडा गुण दिले जातात. या गुणांमुळे विद्यार्थ्यांना सवलत मिळते. शालेय विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासासोबतच खेळांमध्ये आवड निर्माण व्हावी, यासाठी क्रीडा गुण देण्याची पद्धत सुरू करण्यात आली. इयत्ता दहावी पूर्वी खेळाडू विद्यार्थ्याने प्रावीण्य मिळवले असले तरी, सवलतीचे गुण मिळण्यासाठी अर्ज करावा लागतो. अर्ज करण्यासाठी त्याच खेळ प्रकारात किमान जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभाग घेणे आवश्यक आहे. दहावी व बारावीमध्ये शिकत असलेल्या खेळाडू विद्यार्थ्याने एकापेक्षा जास्त स्पर्धेत प्रावीण्य प्राप्त केले असले तरी त्या खेळाडू विद्यार्थ्याला उच्चतम अशा एकाच स्पर्धेच्या गुणास पात्र ठरवले जाते.

# जानेवारी २०२५ पासून सुरू झालेल्या इग्नो अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रियेस दि.२८ फेब्रुवारी २५ पर्यंत मुदतवाढ
## एस.सी.,एस.टी.वर्गवारीतील विद्यार्थ्यांना पदवी करिता नि:शुल्क प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १७ अमरावती**

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्लीच्या अमरावती येथील अभ्यास केंद्राअंतर्गत जानेवारी, २०२५ पासून सुरू झालेल्या सत्राकरिता एम.ए. ( इंग्रजी, हिंदी, राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, लोकप्रशासन, ग्रामीण विकास, दूरशिक्षण, तत्वज्ञान), एम.कॉम. एम.बी.ए., (फायनान्स, हुमन रिसोर्स, मार्केटिंग, ऑपरेशन, सर्वीस मॅनेजमेंट प्रवेश परीक्षेशिवाय) बी.ए., बी.कॉम.सामान्य, बी.ए.टुरिझम, बी.ए.ऑनर्स (अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, लोकप्रशासन, समाजशास्त्र, इंग्रजी, हिंदी), बी.कॉम. (लेखा व वित्त), पदव्युत्तर पदविका (ग्रामीण विकास, इंटरनॅशनल बिझिनेस ऑपरेशन, ॲग्री बिझिनेस, हुमन रिसोर्स मॅनेजमेंट, फायनान्सीयल मॅनेजमेंट, ऑपरेशन्स मॅनेजमेंट आणि मार्केटिंग मॅनेजमेंट), डिप्लोमा (पर्यटन, एचआयव्ही अँड फॅमिली एज्युकेशन), सर्टिफिकेट (आपत्ती व्यवस्थापन, फुड ॲन्ड न्युट्रीशन, हुमन राईट्स, गायडन्स, न्युट्रीशन ॲन्ड चाईल्ड केअर, कंझुमर प्रोटेक्शन, फक्शनल इंग्रजी, ग्रामीण विकास, टिचींग ऑफ इंग्लीश, टुरिझम, एचआयव्ही अँड फॅमिली एज्युकेशन) इत्यादी अभ्यासक्रमांकरिता प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली आहे.

इग्नोच्या www.ignou.ac.in वेबसाईट वरून तसेच https://ignouadmission.samarth.edu.in/ ह्या लिंकवरून अर्ज सादर करण्याची अंतिम तिथी दिनांक २८ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत वाढविण्यात आली असून प्रवेश शुल्क इंटरनेट बँकींग/डेबीट/क्रेडीट/एटीएम कार्डद्वारे भरता येईल. सविस्तर माहितीपुस्तिका व ऑनलाईन अर्ज कसा सादर करावा याबाबतची माहिती इग्नोचे उपरोक्त वेबसाईटवर उपलब्ध आहे.

अनुसुचित जाती/ जमाती वर्गवारीतील विद्यार्थ्यांना बी.ए.,बी.कॉम.बी.एस्सी. पदवी करिता नि:शुल्क प्रवेश देण्यात येत आहेत.

# चाळीस हजार लाभार्थ्यांना मिळेना धान्यकार्ड अपडेट नाही
## २९ हजार नवीन रेशन कार्ड धारक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

केवायसी नसल्याने तसेच सॉफ्टवेअर मधील तांत्रिक अडचणीमुळे दहा हजार नवीन रेशन कार्ड झालं, चाळीस हजार लाभार्थी स्वस्त धान्यापासून वंचित आहे. वर्षभरापासून त्यांना धान्य मिळाले नाही. वारंवार होईल रेशन दुकानात जाऊन परत यावे लागत आहे. वॉश मशीन मध्ये कार्ड पंच केल्यानंतर इन व्हॅलिड असा संदेश येत आहे. त्यामुळे अनेकांची रेशन थांबले आहेशासनाने मोफत धान्य देण्याची योजना घोषित केली असती तरी त्याचा लाभ अंत्योदय अन्य योजना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतील कार धारकासाठी लागू आहे. जिल्ह्यात सध्या स्थितीत सहा लाख ५३ हजार ४२९ नागरिक रेशन कार्ड धारक आहेत. जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ या एका वर्षात २९ हजार १७१ नवीन कारभार वाढले. रेशन कार्ड धारकांना धान्य मिळण्यासाठी आता केवायसी ची अट घालण्यात आली असून यापूर्वी तीन ते चार वेळा केवायसी करण्यात शासनाकडून मुदत वाढ देण्यात आली आहे. ३२ टक्के रेशन कार्डधारकांनी केवायसी प्रक्रिया पूर्ण केली नाही त्यामुळे त्यांना आता २८ फेब्रुवारी हे अंतिम मदत देण्यात आली आहे यामध्ये तिचे रेशन कार्ड धारक केवायसी करणार नाहीत त्यांना मिळणाऱ्या धान्य कपात केली जाईल या योजनेचा फायदा संबंधितांनी नियमित धन्य घेतल्यानंतर दिला जात आहे.



> ३२ टक्के लाभार्थ्यांची केवायसी अपूर्णरेशन दुकानदारांना लाभार्थ्यांचे केवायसी पूर्ण करण्याबाबतच्या सूचना वारंवार दिल्या आहेत. आजपर्यंत ६८% लाभार्थ्यांची केवायसी पूर्ण झाली असून अद्यापही ३२ टक्के लाभार्थी शिल्लक आहेत. त्यामुळे नागरिकांनी केवायसी पूर्ण करावी अन्यथा शासनाच्या आदेशाचे रेशन कपात केले जाईल.
> **निनाद लांडे जिल्हा पुरवठा अधिकारी.**

# जिल्हास्तरीय कृषि विकास परिषद व प्रदर्शनी मुळे सायन्सकोर मैदानावर घाणीचे साम्राज्य

## ट्रॅकची झाली दैयनीय अवस्था

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

अमरावती येथील सांयन्सकोर मैदान येथे सुरु असलेल्या जिल्हास्तरीय कृषि विकास परिषद व प्रदर्शनी भरविण्यात आली असून या प्रदर्शनीला शेतकरी व नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पहायला मिळत आहे. मात्र या ठिकाणी लावण्यात आलेल्या खाद्यपदार्थ्यांच्या स्टोल मुळे परिसरात मात्र दुर्गंधी व घाणीचे साम्राज्य पसरलेले असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. एवढेच नाही तर मैदानावर जेष्ठ नागरिकांना फिरण्यासाठी जे ट्रॅक तयार



करण्यात आले आहे त्याच ट्रॅकवर पहाटेचा विधी व लघुशंका करण्यात येत आहे.

मुलांना खेळण्यासाठी व जेष्ठ नागरिकांना फिरण्यासाठी शहरातील मध्य असे असलेले सायन्सकोर मैदानावर सध्या कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. परिसरात पसरलेल्या दुर्गंधीमुळे नागरिक हैराण झाले आहेत. मैदानाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळच कचऱ्याचे ढीग साचले आहेत. अत्यंत घाण व दुर्गंधीयुक्त झालेल्या या मैदानाकडे जिल्हा प्रशासन लक्ष देणार का ?असा प्रश्न आता सामान्य नागरिक विचारीत आहेत. या मैदानावर सध्या जिल्हास्तरीय कृषि विकास परिषद व प्रदर्शनी मोठ्या थाटात सुरु आहे. प्रदर्शनीमध्ये एकूण २८८ स्टॉल लावण्यात आलेले आहेत त्यात काही स्टॉल हि खाद्य पदार्थ्यांचे आहेत. हे खाद्यपदार्थ संचालक रात्री प्रदर्शनी बंद झाल्यानंतर उरलेले उष्ट अन्न स्टॉलच्या मागच्या बाजूने असलेल्या ट्रॅकवर फेकून देतात. त्यामुळे त्या ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरले आहे सकाळी जेंव्हा जेष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणात सर्वच वयोगटातील स्त्री–पुरुष येथे वॉकिंग करण्यासाठी येतात.तेंव्हा त्यांना या दुर्गंधीचा सामना करावा लागतो त्यामुळे जिल्हा प्रशासनाने या कडे लक्ष देणे गरजेचे आहे

**कंटेनरचा काहीच उपयोग नाही**

कचरा टाकण्यासाठी कंटेनर या ठिकणी ठेवण्यात आलेले आहेत मात्र कोणीही त्या ठिकाणी कचरा टाकत नाही तर सुलभ सौचालयाची व्यवस्था हि मैदानावर करण्यात आली आहे मात्र त्या हि सुलभ सौचालयात कोणीही जात नाही व मैदानावरच मिळेल त्या ठिकाणी सकाळचा विधी आटोपून प्रदशणी मध्ये व्यवसाय करण्यात तयार राहतात.

आम्ही या ठिकाणी दररोज सकाळी फिरायला येतो मात्र सध्या या मैदानावर जागोजागी कचऱ्याचे ढीग व दुर्गंधी पसरली आह. ट्रॅकवरून फिरतांना प्रचंड दुर्गंधी चा सामना करावा लागतो. शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती व्हावी या साठी हि प्रदर्शनी या ठिकाणी लावण्यात आली आहे हे उत्तमच मात्र या ठिकाणी असलेल्या खाद्य पदार्थाच्या स्टॉल संचालकांनी या ठिकाणी घाण करणे हे काही योग्य नाही.

**सुधीर कडू सामान्य नागरिक**

# आकांक्षी शौचालय चे श्रमदान करून स्वच्छ ; कुलूप तोडून लाडक्या बहिणीच्या हस्ते बंद पडलेले शौचालय जनतेसाठी लोकार्पित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती**

अमरावती शहरातील सार्वजनिक सुविधांकडे होत असलेल्या दुर्लक्षावर प्रहार जनशक्ती पक्षाने थेट कृती करत निषेध नोंदवला आहे. शहरात अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असे पाच सार्वजनिक शौचालये उभारण्यात आली होती. मात्र, गेल्या अडीच वर्षांपासून ही शौचालये वापरासाठी खुली करण्यात आलेली नव्हती. महानगरपालिके चया निष्क्रीयतेला कंटाळून अखेर प्रहारच्या कार्यकर्त्यांनी आज (१७ फेब्रुवारी) दुपारी १ वाजता शौचालयाचे कुलूप तोडून ते सुरू केले. या वेळी मोठ्या उत्साहात बँड वाजवत आणि घोषणा देत आंदोलन करण्यात आले. विशेष म्हणजे, प्रहारच्या लाडक्या बहिणीने शौचालयाचे उद्घाटन करून हा संघर्ष जनतेसाठी असल्याचे स्पष्ट केले.शहरातील नागरिकांसाठी महत्त्वाच्या असलेल्या या सुविधा



प्रशासनाने सुरू न केल्याने प्रहारने आक्रमक पवित्रा घेत हा मुद्दा लावून धरला. त्यांच्या या कृतीमुळे महानगरपालिकेच्या दुर्लक्षावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. नागरिकांतूनही यावर संताप व्यक्त होत असून, महानगरपालिकेने त्वरित ही शौचालये सुरू करावीत, अशी मागणी होत आहे.

या प्रसंगी प्रदेश प्रवक्ते जितू दुधाने,जिल्हाध्यक्ष छोटू महाराज वसू,महानगर प्रमुख बंटी रामटेके,गोलू पाटील,भीम ब्रिगेड चे राजेश वानखेडे,प्रदेश सचिव नंदू कुयटे,उपसरपंच अतुल सिंघम, उमेश मेश्राम,अकबर भाई, शाम इंगळे, मनीष पवार, समीप तायडे,अभिजित देशमुख,प्रशांत शिरभाते, अभिजित गोंडाने, विक्रम जाधव, शेषराव धुळे,नंदू वानखेडे, कुणाल खंडारे,अजय तायडे, ठाकरे, भुले,वैशाली गावंडे,इंगळे ताई, अनिता सोमकुंवर,पुष्पा तेलगोटे,कविता भुसंम आदी उपस्थित होते.

# घुंगराच्या आवाजात रस पिणार;दूषित बर्फ घसा खराब करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

शहरासह ग्रामीण भागात विविध रस्त्यांवर, वर्दळीच्या ठिकाणी रसवंतीगृहे थाटायला सुरुवात झाली आहे.तर काही ठिकाणी रसवंती सुरू झाली आहे मात्र, याठिकाणी वापरले जाणारे पाणी शुद्ध आहे का? रसामध्ये टाकण्यात येणारा बर्फ शुद्ध पाण्यापासून तयार केला जातो का? याबाबतच्या तपासणीकडे दुर्लक्ष होत आहे. आरोग्य जपण्यासाठी बिनाबर्फाचा रस पिणे कधीही चांगले असते.

उन्हाळ्यात चार महिन्यांचा हंगाम म्हणून अनेकजण परवानगीशिवाय हा व्यवसाय सुरू करतात. अमरावती



शहरासह ग्रामीण भागात अशी रसवंतीची दुकाने थाटली आहेत. बऱ्याच व्यावसायिकांना रितसर परवानगीचा विसर पडल्याचे दिसून येते. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर शरीरातील दाहकता कमी करण्यासाठी विविध प्रकारच्या थंड पेयांची दुकाने थाटली जातात. यात आईस्क्रीम, लस्सी, कोल्ड्रिंक्स, लिंबूपाणी आणि रसवंती आदी दुकानांचा यात समावेश होतो.खाण्यासाठी असलेला बर्फ शुद्ध पाण्यापासून बनविणे बंधनकारक आहे. मात्र, असा बर्फ महाग असल्याने अनेकदा थंड पेय विक्रेते स्वस्त पडणारा बर्फ खरेदी करताना दिसतात.तापमान वाढल्याने थंडपेयांची मागणी वाढली आहे. त्यातही उसाच्या रसाला नागरिकांची पसंती आहे. बर्फाचा रस एक छोटा ग्लास दहा रुपयांना मिळतो. तर बिनाबर्फाचा उसाचा रस एक ग्लास २० रुपयांना मिळतो. उसाच्या तुलनेत बर्फ स्वस्त असल्याने हा फरक पहावयास मिळतो.

**घसा खवखवतो,**
**सर्दी–पडशाचा धोका!**

बर्फ टाकलेल्या रसाला मागणी असते. मात्र, अशुद्ध बर्फाचा वापर रसामध्ये होऊ शकतो. असा बर्फ टाकलेला रस पिल्यास घसा खवखवतो. तसेच सर्दी–पडशाचा धोकाही वाढतो.

**...तर पोटाचा त्रास**

अस्वच्छ पाण्यापासून तयार केलेला बर्फ पोटात गेल्यास घसादुखी, जुलाब तसेच पोटात इन्फेक्शन होऊन पोटदुखीची समस्या इदभवू शकते. सर्दी–खोकल्याचीही बाधा होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी रसवंतीगृहावर रस पिताना या गोष्टींची खबरदारी घेणे अधिक गरजेचे आहे.

**बिनाबर्फाचा रस महाग का?**


अनेकदा रस घेताना तो बर्फाचा की विनाबर्फाचा हवा, असे विचारले जाते. बर्फ वितळून त्याचे पाणी होते. त्यामुळे उसाच्या एका काडीत पाच ग्लास रस तयार होतो. याउलट बिनाबर्फाच्या रसासाठी जास्त ऊस लागतो. सोबतच आले, लिंबू वेगळे टाकावे लागते. त्यामुळे बिनाबर्फाचा रस बर्फाच्या रसापेक्षा महाग विकला जातो. मात्र, शरीरासाठीही तो चांगला असतो.

# शाळा समित्यांमुळे शिक्षकांचे बेहाल एकच समिती ठेवण्याची शिक्षक संघटनांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

शिक्षणाचा ढासळत चाललेला र्जा, विद्यार्थ्यांची कमी होत बणारी संख्या, तसेच सनाच्या अनास्थेचे बळी रलेल्या स्थानिक चराज्य संस्थांच्या बाळांमधील समित्यांची ख्या आता शिक्षकांची डोकेदुखी बनल्या आहेत. एक, दोन नव्हे, तर तब्बल १९ समित्या शाळास्तरावर कार्यरत असून, त्या समित्यांवरील सदस्यांची मने चुचकारण्याचे काम शिक्षकांना करावे लागत आहे.या सर्व समित्या बरखास्त करून केवळ एकच मध्यवर्ती समिती असावी,

असा एक जोरदार मतप्रवाह सुरू झाला आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांविषयीची शासनाची अनास्था अनेकदा विविध कारणांनी समोर येत असते. शिक्षकांवर अशैक्षणिक कामांची जबाबदारी ढकलून शासन मोकळे होऊन जाते. मात्र, त्याचा परिणाम शैक्षणिक गुणवत्तेवर होत आहे.शालेय पोषण आहाराच्या जबाबदारीतून आपल्याला मुक्त करावे, अशी मागणी वेळोवेळी शिक्षक संघटना करीत आहेत. त्यातच एक ना धड भाराभार समित्यांमुळे शिक्षकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.समित्यांमधील



सदस्यांचे हेवेदावे शिक्षकांच्या पथ्यावर पडत आहेत. त्याचा थेट परिणाम शैक्षणिक गुणवत्तेवर होताना दिसत आहे.

**अशा आहेत समित्या**

शाळास्तरावर प्रामुख्याने शाळा व्यवस्थापन समिती, परिवहन समिती, शालेय पोषण आहार समिती, महिला तक्रार निवारण समिती, विशाखा समिती, माता पालक संघ, सखी सावित्री समिती, आपत्ती व्यवस्थापन समिती, बालरक्षक समिती, विद्यार्थी सुरक्षा समिती, प्रहरी क्लब, इको क्लब, निपुण भारत, माता पालक संघ, तंबाखू व्यसनमुक्ती समिती, राजू–मौला मंच, बालहक्क तक्रार समिती याशिवाय स्थानिक स्तरावर अन्य काही समित्या कार्यरत आहेत.

# दिव्यांग निधी मार्चपर्यंत खर्च होणार का? केवळ ५३ टक्केच निधी आता पर्यंत खर्च

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**

तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या एकूण उत्पन्नातील पाच टक्के निधी गावातील दिव्यांगांवर खर्च करणे बंधनकारक आहे. येत्या मार्च महिन्याच्या अखेरीला केवळ दोन महिने शिल्लक असूनही ग्रामपंचायतींनी केवळ ५३ टक्के निधी खर्च केला आहे. त्यामुळे उर्वरित निधी मार्चपर्यंत खर्च करणे ग्रामपंचायतीसमोर आव्हान आहे.

शासनाच्या निकषांनुसार पाच टक्के निधीतील ५० टक्के निधी वैयक्तिक व उर्वरित निधी सार्वजनिक स्वरूपात खर्च करणे अपेक्षित आहे. शिलाई मशीन, पिठाची गिरणी, व्हीलचेअर, फिरते टॉयलेट, मिरची कांडप मशीन अशा विविध वस्तू निधीतून दिल्या जातात, तर सार्वजनिक निधीतून दिव्यांगांसाठी स्वतंत्र रॅम्प, सार्वजनिक वाचनालय, स्पर्धा




परीक्षेसाठी मार्गदर्शन केंद्र अशा सुविधा देणे अपेक्षित आहे. मात्र, बहुतांश ग्रामपंचायती दिव्यांगांचा निधी गावातील रस्ते, गटारीसह इतर आर्थिक लाभांच्या कामांवरच खर्च करत असतात. दिव्यांगांना जिल्हाधिकारी त्यातूनच अनेकदा कार्यालय किंवा तहसील कार्यालयासमोर आंदोलन करावे लागत आहे. यंदाही ग्रामपंचायतींनी पाच टक्के निधी दिव्यांगांवर खर्च करणे बंधनकारक आहे. सध्या एप्रिल महिन्यापासून फेब्रुवारीपर्यंत सुमारे ७० ते ७५ टक्के निधी खर्च करणे आवश्यक असताना तो झाला नाही.

**दहा महिने उलटूनही निधी खर्च केलाच नाही**

दिव्यांग बांधवांसाठी ग्रामपंचायतींनी पाच टक्के निधी खर्च करणे बंधनकारक आहे. सध्याची आकडेवारी पाहता हा निधी नऊ ते दहा महिने उलटूनही खर्च झाला नाही. त्यामुळे ग्रामपंचायतींनी मार्चपर्यंत दिव्यांग निधी खर्च करण्याची मागणी दिव्यांग बांधवांकडून होत आहे.

# इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालयाच्या एनएसएसच्या निवासी शिबिराचे उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १७ अमरावती**

विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीच्या इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर आष्टी घेण्यात येत आहे. सदर शिबीर दि. १५ ते २२ फेब्रुवारीदरम्यान होणार आहे. या शिबिराचे उद्घाटन रविवार, दि. १६ फेब्रुवारी रोजी करण्यात आले.

उद्घाटन सोहळ्याला विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीचे कार्यकारणी सदस्य प्रा. गजानन काळे अध्यक्षस्थानी होते. आष्टीचे सरपंच दिलीप जवंजाळ यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय



सेवा योजनेचे सल्लागार समिती सदस्य गणेश भारती यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रा. काळे यांनी शिबिरार्थींनी शिबिरादरम्यान विविध उपक्रम राबवून सामाजिक जाणीव वृद्धिंगत करावी. तसेच गावातील समस्या सोडविण्यासाठी मार्गदर्शन केले. विशेष शिबिरामधून विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकास करावा याबाबत मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. सीमा अढाऊ यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अनुप आत्राम यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. अरुणा तसरे यांनी आभार मानले. यावेळी प्रा. डॉ. वंदना भोयर, प्रा. वंदना हिवसे, डॉ. वामन जवंजाळ, उत्तमराव जवंजाळ, सुभाष नितनवरे, विशुद्ध जवंजाळ, आनंद जवंजाळ, सुनंदा जवंजाळ उपस्थित होते.

# शासकीय बांधकामाची १००० कोटीची देयके थकीत

## झेडपी, लघु सिंचन, आरोग्य, नगर विकास, पुनर्वसन विभागाच समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ अमरावती**

जिल्ह्यात सार्वजनिक बांधकाम विभागासह जिल्हा परिषद, राष्ट्रीय आरोग्य मिशन, लघु सिंचन, पाणीपुरवठा व नगर विकास, पुनर्वसन आदी विभागातील सुमारे १००० फुटीचे बांधकामाचे शासनाकडे थकित आहे. यातील बहुतांश कामे पूर्ण झाली असून बरेच कामे पूर्णत्वास येत असताना देखील सदर कंटकदारांना त्यांची अदान केल्याने पण टाकदाराकडून शासना प्रतिरोध व्यक्त होत आहे. मागील आठवड्यात सार्वजनिक बांधकाम विभागाचे थकीत बिलापैकी केवळ ३७ कोटी रुपयांची रक्कम अदा करण्यात आली.जिल्ह्यात सन २०२४ २५ या आर्थिक वर्षात अंदाज पत्रकामध्ये मंदिरात मिळालेल्या विविध विभागातील शासकीय कामांना सुरुवात करण्यात आली आहे. जिल्ह्यात अनेक ठेकेदारांनी कामे पूर्ण केली आहे. काही पूर्ण अवस्थेत आहे तर काही अपूर्ण आहेत त्या विविध लेखाशीर्षकावर व विशेषतः अंदाजपत्रकीय कामावर मागील एक वर्षात अपुरा व तोटक निधी वाटप करण्याची पद्धत वित्त विभागाच्या सहकार्याने अवलंबली आहे. हीच पद्धत राज्यात आजवर सुरू असल्याने ठेकेदार कर्ज काढून तसेच उसनवारी करून याशिवाय आपल्याकडील ठेवी मोडून कामाला सुरुवात करतो. शासनाकडून प्राप्त निधीवर सदरची भूषण वारी परत करतो. परंतु यंदा शासनाकडून सदर कामापोटी रक्कम सदा करण्यात आली नाही. त्यामुळे ठेकेदारांना अनेक मानसिक त्रास सोसावा लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागातील ८०० कोटीवर देयक स्थगित आहे. जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचे देखील २५ कोटीची देयके थकले आहे. याशिवाय राष्ट्रीय आरोग्य मिशन लघु सिंचन पाणीपुरवठा नगर विकास पुनर्वसन आदिवासी या विभागातील सुमारे १००० कोटीची देयके तसेच आहे. त्यामुळे ठेकेदारांना बऱ्याच ठिकाणी काम करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. शासनाने ठेकेदाराचे कामाचे पैसे न दिल्यास ते काम कसे करणार असा प्रश्नही बऱ्याच ठेकेदारांनी उपस्थित केला आहे. पैसे अभावी जिल्ह्यातील विकास कामे थांबवली जातील का असेही बोलल्या जात आहे.